POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२०५ ● मुंबई, गुरुवार, २६ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## राज्यात मातृत्वाची परीक्षा!

### कोणी ४ दिवसांच्या बाळाला घेऊन दिली परीक्षा तर कोणी आईचं पार्थिव घरी ठेवून सोडवला पेपर

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

सध्या बारावीची परीक्षा सुरू आहे. याच परीक्षेला एक नवमाता आपल्या तान्ह्या बाळाला घेऊन आली. काहीही झालं तरी परीक्षा चुकवायची नाही, अशी तिची जिद्द. तर दुसरीकडे आपली जन्मदात्री सोडून गेली.तिचं पार्थिव घरी असतानाही तिचंच स्वप्न पूर्ण करण्यासाठी बारावीच्या पेपरला गेलेली शालिनी या दोन्ही मुलींना नव्या पिढीला नवा संदेश दिलाय. बाळाला पाळण्यात घालून त्याला जोजवणारी आई १२ वीच्या परीक्षेला आली होती. हे पाहून साऱ्यांनाच आश्चर्य वाटलं. नांदेडमधल्या बसवेश्वर महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या शीतल चित्ते प्रसूतीनंतर अवघ्या चार दिवसात शरीराची साथ नसताना बारावीचे पेपर लिहितेय.




केवळ प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर ही नवमाता बारावीची परीक्षा द्यायला परीक्षा केंद्रावर पोहोचली. काहीही झालं तरी शिक्षण थांबणार नाही, असा संदेश तिने असंख्य मुलींना दिलाय. बाळाला जन्म दिल्यानंतर शारीरिक परिस्थिती पाहता, नवमातेनं किमान सात दिवस तरी घराबाहेर पडू नये, असं डॉक्टर सांगतात. पण शिक्षणाची तळमळ, प्रबळ जिद्द आणि परिस्थितीवर मात करण्याची ताकद असेल तर कोणतंही स्वप्न अपूर्ण राहत नाही, असा संदेश ती देतेय. यात तिच्या पती आणि सासरच्या कुटुंबीयांनी तिला भक्कम साथ दिली.

**४ दिवसांच्या बाळाला घेऊन परीक्षा**

१८ वर्ष पूर्ण होताच आई वडिलांनी लवकर लग्न लावून दिलं.पण शिक्षणात खंड नको म्हणून २० वर्षाच्या शीतलनं १२ वी करण्याचा निर्णय घेतला.. त्यात ती गरोदर राहिली. ६ फेब्रुवारीला शीतलची प्रसूती झाली. १० फेब्रुवारीपासून बारावीची परीक्षा सुरू होणार होती. पण या अवस्थेतही परीक्षा देण्यावर शीतल ठाम राहिली. अवघ्या चार दिवसांच्या बाळाला सोबत घेऊन ती परीक्षा केंद्रावर आली. परीक्षा केंद्रावर उपस्थित शिक्षक आणि कर्मचा-यांनीही त्यांच्या जिद्दीचं कौतुक केलं. तिच्यासाठी खास मातृस्नेह कक्ष निर्माण केला.

**आईचा परीक्षेच्या दिवशी मृत्यू**


दुसरी एक घटना गोंदियाच्या गोरेगाव तालुक्यातल्या तुमखेडमधली आहे.गेल्या काही दिवसांपासून आजारी असलेल्या शालिनीच्या आईचा परीक्षेच्या दिवशी मृत्यू झाला. मायेचा आधार गेला. पण त्या कोलमडलेल्या परिस्थितही आईचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी शालिनीनं परीक्षा दिली.त्यानंतर साश्रू नयनांनी आईला निरोप दिला. प्रसुतीनंतर चार दिवसांनी तान्हुल्याला घेऊन परीक्षा देणारी शीतल असो किंवा आईचं पार्थिव घरात असताना बारावीचा पेपर द्यायला गेलेली शालिनी असेल. या दोघीही खूप काही शिकवून जातायत. दोन्ही घटनांमध्ये आईचं प्रेम आणि शिक्षणाचा ध्यास दिसतोय.

## मुंबई महापालिकेवर कर्जाचे ओझे!

### तब्बल २.४४ लाख कोटींचा आर्थिक बोजा, आर्थिक ताण वाढला

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई महानगरपालिकेने २०२६-२७ साठी ८०९५२ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला असला तरी विविध पायाभूत प्रकल्पांमुळे पालिकेवरील आर्थिक दायित्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सागरी किनारा मागार्चा उपनगरीय टप्पा, जलबोगदे, गोरेगावझमुलुंड जोडरस्ता, रस्त्यांचे काँक्रीटीकरण तसेच पुलांच्या उभारणी आणि दुरुस्तीमुळे पालिकेची एकूण देणी आता २.४४ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहेत. या प्रकल्पांसाठी आगामी आर्थिक वर्षात ४१ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र जानेवारी २०२६ अखेर पालिकेच्या मुदतठेवी सुमारे ८१




हजार कोटी रुपयांपर्यंत असून प्रकल्पांची देणी या रकमेच्या तिप्पट असल्याने आर्थिक ताण वाढत असल्याचे दिसून येत आहे.

गेल्या काही वर्षांत प्रकल्प खर्च सातत्याने वाढला आहे. २०२३-२४ मध्ये ही देणी १.९० लाख कोटी रुपये होती, ती २०२४-२५ मध्ये २.३२ लाख कोटींवर गेली आणि आता २.४४ लाख कोटींचा टप्पा ओलांडला आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात भांडवली कामांसाठी ४८१६४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पालिकेचे उत्पन्न अपेक्षेइतक्या वेगाने वाढत नसल्याने खर्च भागवण्यासाठी मुदतठेवी आणि राखीव निधीचा वापर केला जात आहे. तसेच चालू वर्षात १३७६५ कोटी रुपयांचे अंतर्गत कर्ज घेण्याचीही योजना आहे. परिणामी, देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका म्हणून ओळख असलेल्या मुंबई महापालिकेवर वाढत्या प्रकल्प खचार्मुळे आर्थिक ताण वाढत असल्याचे या अर्थसंकल्पातून स्पष्ट झाले आहे.

## राज्यात वर्षभरात ४८,२७८ महिला बेपत्ता

### विधानसभेत लेखी उत्तराद्वारे सरकारकडून माहिती सादर

■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यभरात महिला बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये वर्षभरात वाढ झाली आहे. विधानसभेच्या तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरातील माहितीनुसार, राज्यात २०२५मध्ये एकूण ४८ हजार २७८ महिला बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे. २०२४ मध्ये ही संख्या ४५ हजार ६६२ होती. एकूण बेपत्ता महिलांपैकी २०२४मध्ये ३० हजार ८७७ आणि २०२५ मध्ये ३६ हजार ५८१ महिला सापडल्याची नोंद आहे. राज्यात विशेषतः मुंबई, नवी मुंबई, रायगड, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर शहरातील अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याबाबत आमदार मंगेश कुडाळकर, प्रशांत ठाकूर, मनिषा चौधरी यांच्यासह अनेक आमदारांनी यासंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात वरील माहिती देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदभार्तील लेखी उत्तर दिले आहे. या उत्तरानुसार, राज्यातील मुंबई शहर, नवी मुंबई, रायगड, नागपूर शहर आणि छत्रपती संभाजीनगर या पाच जिल्ह्यांत २०२४- २०२५ या कालावधीत एकूण ४ हजार ९८९ बालके हरविल्याची



नोंद करण्यात आली होती. त्यापैकी ४ हजार ८१३ बालके सापडल्याची माहिती या उत्तरातून देण्यात आली आहे. या दोन वर्षात १४ ते १८ वयोगटातील हरवलेल्या मुला-मुलींपैकी ९६ टक्क्यांपेक्षा जास्त मुले व मुली सापडल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

**'ऑपरेशन मुस्कान'**

बेपत्ता व शोषित मुलांचा शोध घेऊन त्यांना पालकांच्या स्वाधीन करण्यासाठी राज्यात २०१५ ते डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत एकूण १३ 'ऑपरेशन मुस्कान' राबविण्यात आली. तर यंदाच्या वर्षात ऑपरेशन मुस्कान सुरू असल्याचे यावेळी लेखी उत्तरात स्पष्ट करण्यात आले. विशेष म्हणजे, राज्यात नवजात बालक विक्रीबाबत मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड अशा एकूण पाच ठिकाणी ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

## सातार्‍यात संतापाची लाट... गावगुंड आरोपी अजूनही फरार असल्याने सैनिकांचा आक्रोष मोर्चा

■सातारा। प्रतिनिधी,

शूरवीरांची भूमी आणि सैनिकांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सातारा जिल्ह्यात सध्या संतापाची लाट उसळली आहे. खटाव तालुक्यातील चितळी येथील माजी सैनिक रणजीत निकम यांची काही समाजकंटकांनी धारदार शस्त्राने निर्घृण हत्या केल्याच्या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. या अमानवीय कृत्याचा निषेध करण्यासाठी आणि मृत सैनिकाला न्याय मिळवून देण्यासाठी आज जिल्ह्यातील हजारो आजी-माजी सैनिकांनी एकवटून सातारा जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य 'निषेध मोर्चा' काढला. या मोचार्मुळे सातारा शहरात कमालीचे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाकडून चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. 'भारत माता की जय' आणि 'रणजीत निकम यांना न्याय मिळालाच पाहिजे' अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून गेला होता.

या आंदोलनाची पार्श्वभूमी अत्यंत विदारक आणि संतापजनक आहे. खटाव तालुक्यातील चितळी गावातील माजी सैनिक रणजित निकम यांची गावातीलच काही गुंडांनी पूर्ववैमनस्यातून हत्या केल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी आणि माजी सैनिक संघटनेने केला आहे. देशाच्या सीमांचे रक्षण करून सुखरूप घरी परतलेल्या



सैनिकावर आपल्याच मायभूमीत अशा प्रकारे प्राणघातक हल्ला होणे, ही बाब जिल्ह्यासाठी भूषणावह नसल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली. या हल्ल्यातील मुख्य सूत्रधार आणि फरार आरोपींना अद्याप अटक न झाल्याने सैनिकांच्या मनात प्रशासनाप्रती तीव्र असंतोष पाहायला मिळाला. ही हत्या केवळ एका व्यक्तीची नसून ती खाकी वर्दीवर आणि सैनिकी सन्मानावर झालेला हल्ला असल्याचे सैनिकांनी यावेळी बोलून दाखवले.

आज सकाळी सातारा शहरात दाखल झालेल्या या मोर्चात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून माजी सैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे, अनेक माजी सैनिक आपली रेजिमेंट कॅप, शौर्य पदके (मेडल) आणि सैनिकी पोशाख परिधान करून या आंदोलनात सामील झाले होते, ज्यामुळे या मोचार्ला एक वेगळेच गांभीर्य प्राप्त झाले होते. कडक ऊन असूनही आपल्या सहकाऱ्याला न्याय मिळावा यासाठी वयोवृद्ध माजी सैनिकही रस्त्यावर उतरले होते. आंदोलकांचा वाढता ओघ लक्षात घेता, जिल्हा पोलीस प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात बॅरिकेड्स लावून सुरक्षा व्यवस्था कडक केली होती. शिस्तबद्ध पण तितक्याच आक्रमक पवित्र्यात निघालेल्या या मोचार्मुळे सातार्‍यातील वाहतूक व्यवस्थेवरही परिणाम झाला होता.

आंदोलक माजी सैनिकांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस प्रमुखांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. या प्रकरणातील फरार आरोपींना तात्काळ अटक करावी, खटला जलदगती न्यायालयात चालवून गुन्हेगारांना फाशीची शिक्षा द्यावी आणि पीडित निकम कुटुंबाला शासनाकडून तातडीने आर्थिक मदत व संरक्षण मिळावे, अशा प्रमुख मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत. प्रशासनाकडून ठोस आश्वासन मिळेपर्यंत मागे न हटण्याचा पवित्रा आंदोलकांनी घेतला होता. आता या प्रकरणात पोलीस प्रशासन कोणती पावले उचलते आणि आरोपींच्या मुसक्या कधी आवळल्या जातात, याकडे संपूर्ण सातारा जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना होळीची भेट

### महागाई भत्त्यात एवढी वाढ

■मुंबई। प्रतिनिधी,

मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील लाखो राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी दिलासादायक ठरणारा असा हा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारी आणि इतर पात्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेऊन सरकारने कर्मचाऱ्यांना होळीची भेट दिली आहे. वित्त आणि नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी बुधवारी (२५ फेब्रुवारी) विधान परिषदेत महागाई भत्त्यात वाढ करण्याच्या निर्णयाची माहिती निवेदनाद्वारे दिली.

वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी आज विधान परिषदेत राज्य शासनाने राज्य शासकीय व इतर पात्र



कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ३ टक्क्यांनी वाढ करण्यासंदर्भात माहिती दिली. महागाई भात्यातील ही वाढ जुलै २०२५ पासून लागू करण्यात येणार असून जुलै २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीतील थकबाकीची रक्कम गुढीपाडव्याच्या निमित्ताने मार्च २०२६ मध्ये देण्यात येईल. तर नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील थकबाकीसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## दहावीचा गणिताचा पेपर सुरु असताना प्रसुती वेदना


### विद्यार्थीनीने बाथरुममध्ये दिला बाळाला जन्म, माहिती मिळताच कान्हा फरार

■मुंबई। प्रतिनिधी,

दहावीची परीक्षा सुरु असताना एका अल्पवयीन विद्यार्थिनीने नवजात बालकाला जन्म दिल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. एका खासगी परीक्षा केंद्रावर गणिताचा पेपर सुरू असताना ही घटना घडली. या घटनेने परिसरात आणि शिक्षण विभागात मोठी खळबळ उडाली असून, प्राथमिक तपासात विद्यार्थिनीवर अत्याचार झाल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. मध्यप्रदेशातील धार जिल्ह्यातील ही घटना आहे.

**'कान्हा'ने केले अत्याचार**

या गंभीर प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी पीडित मुलीची विचारपूस केली. यावेळी



**गणिताचा पेपर सुरु असतानाच दिला बाळाला जन्म**

धार जिल्ह्यातील एका परीक्षा केंद्रावर ही विद्यार्थिनी पेपर देण्यासाठी आली होती. परीक्षा सुरू असतानाच तिच्या पोटात अचानक तीव्र कळा सुरू झाल्या. ती तातडीने स्वच्छतागृहात गेली, तिथे तिने एका बाळाला जन्म दिला. परीक्षा केंद्र संचालकांना या प्रकाराची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ १०८ रुग्णवाहिकेला पाचारण केले. विद्यार्थिनी आणि नवजात बालकाला तातडीने पीथमपूर येथील सामुदायिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. सध्या माता आणि बाळ दोघांचीही प्रकृती स्थिर असून ते डॉक्टरांच्या देखरेखीखाली आहेत.

तिने धक्कादायक खुलासा केला की, गेल्या दोन वर्षांपासून बेटमा येथील जीवन ज्योती कॉलनीतील 'कान्हा' नावाचा तरुण तिच्या संपर्कात होता. लग्नाचे आमिष दाखवून आणि धाक दाखवून तो तिच्यावर वारंवार शारीरिक अत्याचार करत होता. या छळातूनच तिला गर्भधारणा झाली होती. पीडितेच्या जबाबानुसार, पोलिसांनी संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला असून त्याचा शोध सुरू केला आहे.

**आरोपीचा शोध सुरु**

पोलिसांनी सांगितले की, घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी आणि रुग्णालयात पोहोचले होते. सध्या पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपासासाठी संबंधित पोलीस ठाण्याकडे हे प्रकरण सोपवले आहे. अल्पवयीन मुलीवर झालेल्या या अत्याचारामुळे संताप व्यक्त केला जात असून, आरोपीला लवकरच अटक करून कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे आश्वासन पोलिसांनी दिले आहे.

## पोलीस कर्मचाऱ्याची अंबाझरी तलावात उडी मारून आत्महत्या!

### मुलांच्या कस्टडीवरून वाद झाल्याने टोकाचं पाऊल




■नागपूर। प्रतिनिधी,

नागपुरात कौटुंबिक वादाला कंटाळून एका पोलीस कर्मचाऱ्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शहराच्या प्रतापनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका हेड कॉन्स्टेबलने मंगळवारी (२४ फेब्रुवारी) रात्री अंबाझरी तलावात उडी मारून आपलं आयुष्य संपवलं.

शिलरत्न बेलेकर (४५ वर्षे) अशी मृत पोलीस कर्मचाऱ्याची ओळख समोर आली असून ते वाघदरी-इसासनी परिसरातील रहिवासी होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळच्या सुमारास काही तरुण अंबाझरी तलावात पोहोण्यासाठी आले होते आणि त्यावेळी त्यांनी पाण्यात एक मृतदेह तरंगताना दिसला. त्यांनंतर, त्या तरुणांनी तातडीने अंबाझरी पोलिसांना याची माहिती दिली.

संबंधित घटनेची माहिती मिळताच, पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी मृतदेह तलावातून बाहेर काढला. पोलिसांनी तपास सुरू असता त्यांना मृतदेहाजवळ ओळखपत्र सापडलं आणि त्या आधारे त्यांची ओळख पटवण्यात आली. त्यानंतर, पोलीस कर्मचाऱ्याचा मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी मेडिकल रुग्णालयात पाठवण्यात आला. मृत शिलरत्न बेलेकर यांची काही महिन्यांपूर्वी हिंगणा पोलीस ठाण्यातून प्रतापनगर पोलीस स्टेशनमध्ये बदली झाली होती.

**पत्नीसोबतच्या वादामुळे मानसिक तणाव...**

वृत्तानुसार, मागील दोन वर्षांपासून शिलरत्न यांचे त्यांच्या पत्नीसोबत सतत वाद सुरू होते. याच कौटुंबिक वादामुळे त्यांची पत्नी आपल्या माहेरी राहत होती आणि शिलरत्न त्यांच्या दोन मुलांसह इसासनी येथील त्यांच्या घरी राहत होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या पत्नीने आपल्या मुलांचा ताबा मागितल्यामुळे ते मानसिक तणावात होते. १९ फेब्रुवारीपासून शिलरत्न त्यांच्या ड्युटीवरून गैरहजर होते आणि त्यानंतर ते घरी न परतल्याने त्यांच्या भावाने २२ फेब्रुवारी रोजी प्रतापनगर पोलीस ठाण्यात ते बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. आज सकाळी त्यांचा मृतदेह अंबाझरी तलावात तरंगताना आढळला.

## गर्लफ्रेंडला भेटण्यापूर्वी मोठा हात मारायला गेले... अधिकाऱ्याच्या घरावर डल्ला मारला, पण पोलिसांनी गोळ्या झाडल्या!

■मुंबई। प्रतिनिधी,

उत्तर प्रदेशातील हरदोई जिल्ह्यातून एक धक्कादायक आणि तितकीच फिल्मी घटना समोर आली आहे. आपल्या प्रेयसीला भेटण्यासाठी आलेल्या दोन सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी एका थरारक चकमकीनंतर बेड्या ठोकल्या आहेत. कमरुद्दीन आणि धीरेंद्र सिंह ऊर्फ धीरज अशी या दोघांची नावे असून, त्यांच्या अटकेने एका मोठ्या घरफोडीच्या गुन्ह्याचा उलगडा झाला आहे. विशेष म्हणजे, हे दोघेही आपल्या प्रेयसींना भेटण्यासाठी हरदोईमध्ये आले होते, मात्र ही भेट होण्यापूर्वीच त्यांनी एका शासकीय अधिकाऱ्याच्या घरावर डल्ला मारला. या कृत्यानंतर पसार होण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी त्यांना घेरले, ज्यामध्ये झालेल्या गोळीबारात दोन्ही आरोपी जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या संपूर्ण प्रकरणाची पार्श्वभूमी प्रेमाच्या ट्रायअँगलमधून सुरू होऊन गुन्हेगारीच्या वळणावर संपली आहे. अटक करण्यात आलेला कमरुद्दीन हा बिहारचा रहिवासी आहे, तर धीरेंद्र सिंह हा हमीरपूरचा आहे. या दोघांच्याही प्रेयसी हरदोई जिल्ह्यातील असून त्या नोएडामध्ये नोकरी करत होत्या. तिथेच त्यांची ओळख या गुन्हेगारांशी झाली होती. व्हॅलेंटाईन डेचे औचित्य साधून आपल्या प्रेयसींना भेटण्यासाठी हे



दोघेही हरदोईत दाखल झाले होते. मात्र, केवळ भेटीगाठींवर समाधान न मानता त्यांनी या शहरात चोरी करण्याचा कट रचला. १७-१८ फेब्रुवारीच्या रात्री त्यांनी शहरातील आझाद नगर येथील पॉश परिसरात असलेल्या सिंचन विभागाचे प्रशासकीय अधिकारी सुनील जौहरी यांच्या बंद घराची रेकी केली आणि संधी साधून लाखोंचा ऐवज लंपास केला.

चोरीची घटना उघडकीस आल्यानंतर हरदोई पोलिसांनी तातडीने तपासचक्र फिरवून बावन रोड बायपास परिसरात नाकाबंदी केली होती. यावेळी दुचाकीवरून जाणाऱ्या दोन संशयितांना पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला, मात्र त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न करत थेट पोलिसांवर गोळीबार सुरू केला. पोलिसांनीही स्वसंरक्षार्थ प्रत्युत्तरादाखल गोळ्या झाडल्या, ज्यामध्ये कमरुद्दीन आणि धीरेंद्र यांच्या पायाला गोळ्या लागल्या आणि ते रस्त्यावर कोसळले. पोलिसांनी घटनास्थळावरून दोन गावठी कट्टे, काडतूस, चोरीला गेलेले दागिने, लॅपटॉप, मोबाईल आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त केली आहे. या चकमकीनंतर परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, या कारवाईमुळे स्थानिक गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

तपासादरम्यान या दोन्ही गुन्हेगारांचा गुन्हेगारी इतिहास अत्यंत भयानक असल्याचे समोर आले आहे. धीरेंद्र सिंह यापूर्वी २०२१ मध्ये आग्रा येथे झालेल्या एका चकमकीत जखमी झाला होता, त्याच्यावर व्यापाऱ्याची कार लुटल्याचा आणि जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप आहे. या दोघांवरही नोएडा, आग्रा आणि इतर जिल्ह्यांमध्ये लूटमार, दरोडा आणि आर्म्स ॲक्टचे डझनभर गुन्हे दाखल आहेत. एएसपी सुबोध गौतम आणि सीओ अंकित मिश्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे गुन्हेगार केवळ चोरी करण्यासाठीच शहरात आले होते की त्यांच्यामागे आणखी मोठे नेटवर्क आहे, याचा सखोल तपास सुरू आहे. प्रेमाच्या भेटीसाठी आलेले हे गुन्हेगार आता तुरुंगाची हवा खात असून, पोलिसांनी त्यांच्या टोळीतील इतर सदस्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# या नक्षलवादाची मुळे उखडा!




देहलीतील जवाहरलाल नेहरू विद्यापिठात अर्थात् जे.एन्.यू.मध्ये २२ फेब्रुवारीच्या मध्यरात्री साम्यवादी गटाच्या १०० ते १५० विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) गटाच्या विद्यार्थ्यांवर प्राणघातक आणि हिंसक आक्रमण केले. त्यात २ विद्यार्थी गंभीर घायाळ झाले. साम्यवादी विद्यार्थी येथे नेहमीप्रमाणेच आंदोलन (कि दहशत निर्माण?) करत होते आणि त्या वेळीच त्यांनी विद्यापिठाच्या परिसरात ही दंगल करून हिंदुत्वनिष्ठ विद्यार्थ्यांना लक्ष्य केले. जे.एन्.यू.च्या कुलगुरु डॉ. शांतीश्री धुलीपुडी पंडित यांनी दलित विद्यार्थ्यांविषयी अवमानकारक वक्तव्य केल्याचा कांगावा करून हे विद्यार्थी आंदोलन करत होते आणि याच शहरी नक्षलवाद्यांनी हिंदुत्वनिष्ठ विद्यार्थ्यांवर हे आक्रमण केले. आता पत्रकारिता, समाजमाध्यमे, तसेच लेखक, शिक्षक, विद्यार्थी, समाजसेवक, अभिनेते आदी सर्व स्तरांवर लपून राहिलेल्या शहरी नक्षलवाद्यांना शोधून त्यांचा बीमोड करण्याचे सरकारने मनावर घेतले पाहिजे; कारण जोपर्यंत शहरी नक्षलवाद संपत नाही, तोपर्यंत नक्षलवादाचा पूर्ण बीमोड होणे केवळ अशक्य आहे. केंद्रशासनाने जंगली नक्षलवाद संपवण्याचे मनावर घेतले आणि करून दाखवले, आता त्याचा उत्तरार्ध हिंदू आणि भारतीय नागरिक यांना पहायचा आहे. नोव्हेंबर २०२२ मध्ये अशाच प्रकारे जे.एन्.यू.मधील साम्यवादी विद्यार्थ्यांनी दंगल करून हिंदुत्वनिष्ठ विद्यार्थ्यांना मारण्यासाठी हॉकीच्या काठ्या आणि अन्य काठ्या आणल्या होत्या. त्या वेळी दंगल करण्यासाठी बाहेरील माणसे विद्यापिठात घुसल्याचे उघडकीस आले होते. आताच्या प्रसंगातही तीच शक्यता दाट आहे. संघ किंवा भाजप यांच्या धोरणांनुसार त्यांनी साम्यवाद्यांचा अड्डा असलेल्या जे.एन्.यू. विद्यापिठात साम्यवाद्यांची दादागिरी न्यून करण्यासाठी हिंदुत्वनिष्ठ किंवा राष्ट्रवादी विचारांची त्यांची अभाविप ही संघटना चांगल्या प्रकारे सक्रीय केली. त्यामुळे तेथील राष्ट्रद्रोही कुकृत्ये निदान बाहेर तरी येऊ लागली. तेथे राष्ट्रवादी विचारांचे शिक्षकही नेमण्याचा प्रयत्न झाला; परंतु तेथील शहरी नक्षलवाद्यांचे प्रतिनिधित्व करणार्‍या साम्यवादी विद्यार्थ्यांच्या राष्ट्र आणि धर्म द्वेष काही न्यून झालेला नाही; कारण त्यांचे स्रोत वेगळे आहेत. यात साम्यवादी विद्यार्थ्यांना अतिकठोर शिक्षा झाली नाही, तर हिंदुत्वनिष्ठ विद्यार्थ्यांचे कायमचे खच्चीकरण होऊ शकते. अशा साम्यवाद्यांच्या 'अड्ड्यां'मधील नक्षलवादी हिंसाचार पूर्णपणे मोडून काढणे, हे विद्यापीठ प्रशासनासह शिक्षण विभागाचेही दायित्व रहाते. एकेकाळी लपूनछपून आतंकवाद किंवा नक्षलवाद यांचे समर्थन करणारे येथील साम्यवादी विद्यार्थी आता अतिशय उग्रपणे जंगली नक्षलवाद्यांचा पुरस्कार करत आंदोलन करतात, हे अधिक चिंताजनक आहे. 'हा केवळ वैचारिक मतभेद आहे', असे गोंडसपणे माध्यमांनी म्हणणे, ही माध्यमांचीही दिवाळखोरी आहे. हा राष्ट्रविरोध आहे; किंबहुना राष्ट्रद्रोह आहे. हिडमा नावाच्या कुख्यात नक्षलवाद्याला गेल्या वर्षी नोव्हेंबर मासात सुरक्षा यंत्रणांनी ठार केल्यावर 'प्रत्येक घरातून हिडमा निघेल', अशा घोषणा देत देहलीचे रस्ते अडवले गेले. या विद्यार्थ्यांचे अभिव्यक्तीस्वातंत्र्य राष्ट्रविघातक ठरत आहे, याची जाणीव त्यांच्या पालकांनीही त्यांना करून देणे आवश्यक आहे. अर्थात अशा प्रकारची मुले इतकी स्वकेंद्रित झालेली आहेत की, जी कुणालाच जुमानत नाहीत. वर्ष २०२३ मध्ये प्रक्षोभक भाषणे, उद्घोष, आंदोलने करणार्‍यांना दंडापासून आणि विद्यापिठातून हकालपट्टी करण्यापर्यंत नियम केले आहेत. तरीही त्याचा धाक विद्यार्थ्यांना नाही. आतापर्यंत काही विद्यार्थ्यांवर दंडआकारणी आदी कार्यवाही होत आहे; मात्र तरीही त्याचा काही परिणाम झालेला नाही. याचाच अर्थ 'काही विद्यार्थ्यांचा उद्देश केवळ शिक्षण नव्हे, तर वर्षानुवर्षे या विद्यापिठात राहून हिंदुविरोधी वातावरण अबाधित ठेवणे हा आहे', असेच वाटते. त्यामुळे आतातरी या विद्यार्थ्यांवर काय कारवाई होणार ? हे पुढे आले पाहिजे. शिक्षण घेण्याच्या ठिकाणी राष्ट्रद्रोही कारवायांची पाळेमुळे रुजली आहेत आणि आतापर्यंत ती मुळापासून न उखडली गेल्यामुळे विद्यार्थी–पत्रकारिता–माध्यमे–लेखन–कार्यकर्ते–ते थेट जंगली नक्षलवादी, अशी त्यांची साखळी (एक प्रकारची 'इकोसिस्टम') आहे. नेमके कुठले प्रवाह त्यांना तरुणवयात चुकीच्या दिशेने प्रभावित करून देशविरोधी बनवत आहेत आणि त्यांचे तारुण्यच नव्हे, तर पूर्ण जीवन व्यर्थ करत आहेत, ते वैचारिक प्रवाह रोखले गेले पाहिजेत. जसे जंगली नक्षलवाद्यांचे आर्थिक स्रोत रोखले गेले, तसे या विद्यार्थ्यांना ह्यमार्गदर्शनह्न करणार्‍यांचे आर्थिक स्रोत रोखले गेले पाहिजेत. सरकारने पंतप्रधानांच्या हत्येच्या कटाचा संशय असणार्‍या शहरी नक्षलवाद्यांना कारागृहातून मुक्त केले. हेच या विद्यार्थ्यांचे आदर्श असू शकतात. वर्ष २०२१ मध्ये झालेली 'डिस्मेंटलिंग हिंदुत्व' (हिंदुत्वाचा विध्वंस) यांसारखी आंतरराष्ट्रीय ऑनलाईन परिषद हे त्यांचे वैचारिक स्रोत असू शकतात. या परिषदेची सहप्रायोजक अमेरिकेतील ५० हून अधिक विद्यापिठे होती. 'हिंदुत्व विचारसरणी दलितांवरील अत्याचाराला प्रोत्साहन देणारी आहे', हे दाखवण्यासाठी ही परिषद होती. जे.एन्.यू. विद्यापिठातील आताच्या दंगलीचे मूळ कारण कुलगुरूंचे दलितविरोधी वक्तव्य असल्याचे ठरवून त्याला विरोध करणे, हेच आहे. हे विलक्षण साम्य दंगलीचे वैचारिक स्रोत कुठपर्यंत जातात, हे उघड करते. 'सर्व डोळे गाझावर' यांसारखी आंतरराष्ट्रीय 'टूलकीट' किंवा सोनम वांगचुक यांच्यासारख्यांची आंदोलने, ही या विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान असतात. मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यातही अमेरिकेत हिंदुविरोधी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यात प्रामुख्याने 'हिंदुत्व ही नाझीवादी, अल्पसंख्यांकविरोधी, नागरी हक्कांची पायमल्ली करणारी विचारसरणी', असे पसरवले गेले. या आर्थिक महासत्तेच्या स्रोताकडून येणारी विचारसरणी नाही म्हटले, तरी सर्व जगावर प्रभाव टाकते. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत अग्नीशामक पावडर फेकणे, यांसारख्या भयानक कृती करण्याची मनोवृत्ती ही महाविद्यालयीन शिक्षण घेणार्‍या सामान्य विद्यार्थ्याची नसते, तर द्वेषाने भरलेल्या विचारसरणीतून आलेल्या जिहाद्याची असते. समता, राज्यघटना आदी गोष्टी अशा दंगलीतील कुठल्या वैचारिकतेशी साम्य दाखवतात? कुठले अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि कुठल्या लोकशाहीच्या नियमात बसतात? याची उत्तरे आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना प्रसिद्धीमाध्यमे अन् सरकार विचारणार का? त्यांनी ती विचारली पाहिजेत. साम्यवाद्यांनी आतापर्यंत अनेक हत्याकांडे केल्याचा इतिहास आहे. त्याची 'री' ओढत हे विद्यार्थी चुकीच्या पायंड्यावरून जात आहेत. 'या हिंदूबहुल देशात कडक कायदा आणि सुव्यवस्था आहे', याचीही जाणीव करून दिली पाहिजे; अन्यथा विद्यापिठाच्या माध्यमातून फोफावलेला शहरी नक्षलवाद कधी शमणारच नाही!

# इतिहासात न अडकता भविष्याकडे लक्ष द्यायला हवे




मैं ये करना चाहता हूँ ओ करना चाहता हूँ, लेकीन तकदीर साथ नही देती, मैं ताजमहाल बनाना चाहता हूँ लेकीन मुमताज नही मिलती। हा खूप प्रसिद्ध शेर आहे. जीवनात माणसाला खूप काही करावेसे वाटत असते, विशेषतः उमेदीच्या दिवसात तर काय करू आणि काय नको, अशी अवस्था होते, पण हे सगळे करत असताना माणसाला नशिबाची साथ मिळावी लागते. ती जर का मिळाली नाही, तर एकामागोमाग एक वर्षे निघून जातात, काळ पुढे सरकत जातो, पण मनासारखे काही होत नाही. उलट, बरेचदा काटा रुते कुणाला आक्रंदतात कोणी, या नाट्यगीतातील 'काही करू पहातो, रुजतो अनर्थ तेथे', अशी अवस्था होऊन बसते. जीवनात पुढे जाण्यासाठी, यशस्वी होण्यासाठी सुविधा, प्रयत्न आणि प्रोत्साहन आवश्यक असते, पण त्याचबरोबर नशीब हा घटक तुम्हाला अनुकूल असावा लागतो. आपल्याकडील दोन जागतिक कीर्तीच्या क्रिकेटपटूंनी आपल्या मुलांना आपल्यासारखे क्रिकेटपटू बनवण्यासाठी लहानपणापासून सर्व सुविधा आणि प्रोत्साहन दिले, पण त्यांच्या मुलांना त्याचा काही उपयोग करता आला नाही. एखाद्या मुलाचे व्यक्तिमत्व रुबाबदार असते, तो सुशिक्षित असतो, त्याची आर्थिक परिस्थिती चांगली असते, असे असूनही त्याचा विवाह होत नसतो, तेव्हा अनेकांना प्रश्न पडतो, याचे लग्न का होत नाही? अर्थात, एखाद्याला लग्न न करता स्वतःला राष्ट्रीय कार्यासाठी वाहून घ्यायचे असेल, एखाद्या संशोधनात गुंतवून घ्यायचे असेल तर तो भाग वेगळा. भारतीय समाजात अविवाहित तरुण–तरुणींच्या विवाहाबद्दल समाजातील लोकांना फार उत्सुकता असते. त्यामुळे ते विचारत राहतात किंवा आपापसात चर्चा करत राहतात. जर तो मुलगा किंवा मुलगी कुणा सेलिब्रिटीची असेल तर त्याची अधिकच चर्चा होते. लग्नात मूळ अडचण आर्थिक परिस्थितीची असते. सेलिब्रिटींच्या मुलांची ती काही समस्या नसते.

काँग्रेसला आणि विशेषतः काँग्रेसच्या शीर्षस्थ नेत्या सोनिया गांधी यांना ज्यांना पंतप्रधान बनवायचे आहे, हे राहुल गांधी नुकतेच भिवंडीच्या दंडाधिकारी न्यायालयात हजेरी लावून गेले. आता विचार करा, दिल्ली कुठे आणि भिवंडी कुठे? राहुल गांधी हे काँग्रेसचे युवराज मानले जातात, त्यांना सगळ्या काँग्रेसजनांकडून तसाच मान दिला जातो. पण युवराजाला दिल्लीतून थेट भिवंडीला यावे लागते, भिवंडीच्या न्यायालयात येण्याची त्यांची ही काही पहिलीच वेळ नाही. त्यांच्यावर आरोप असा आहे की, त्यांनी इथल्या सोनाळे गावातील प्रचारसभेत बोलताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लोकांनी महात्मा गांधी यांची हत्या केली असा आरोप केला. ही २०१४ सालची घटना आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर संघाचे कार्यकर्ते राजेश कुंटे यांनी राहुल गांधी यांच्याविरोधात भिवंडी न्यायालयात याचिका दाखल केली. राहुल गांधी यांच्यावर खटला दाखल झाल्याला आता १२ वर्षे झाली आहेत. तरीही राहुल गांधी यांच्यामागील कारवाईचा ससेमिरा काही थांबलेला नाही. तो पुढे किती काळ चालणार आहे ते माहीत नाही. राहुल गांधी यांच्यासाठी जामीन राहिलेले माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकुरकर यांचे गेल्या वर्षी निधन झाले. त्यामुळे यावेळी शनिवारी जेव्हा राहुल गांधी भिवंडी न्यायालयात आले तेव्हा त्यांच्यासाठी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे जामीन राहिले.

स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर आणि संघ यांच्यावरील टीका राहुल यांना नडते. त्यांनी त्यांच्या वडिलांचा, पणजोबांचा, आजीचा आदर्श ठेवून आधुनिक भारताचे नेते व्हायला हवे होते. भाजपचे ज्येष्ठ नेते नेहरू–गांधी घराण्यावर सातत्याने टीका करतात, त्याला उत्तर देण्यासाठी राहुल गांधी सावरकर आणि संघावर बेधडक टीका करतात, पण त्यांना हे कळत नाही की, यातून आपण आपल्या जीवनातील अमूल्य वेळ वाया घालवत आहोत, या टीका टिप्पण्यांतून काही साध्य होणार नाही. उलट, त्यातून आपल्या अडचणी वाढत जाणार आहेत, तसेच होत आहे. त्यांना दिल्लीतून भिवंडीसारख्या छोट्या शहरात न्यायालयात उपस्थित राहण्यासाठी पुन्हा पुन्हा यावे लागत आहे. एका राष्ट्रीय पक्षाच्या मुख्य नेत्यावर जर ही वेळ येत असेल तर याला काय म्हणावे. आपल्या वक्तव्याचे काय परिणाम होऊ शकतील, याचा त्यांनी विचार करायला हवा होता. आपल्याकडे कुठलाही पुरावा नसताना महात्मा गांधी यांच्यासारख्या मोठ्या नेत्याच्या हत्येचा आरोप त्यांनी थेट संघावर केला. आपण एका राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख नेते आहोत, त्यामुळे आपले विधान हे गांभीर्याने घेतले जाईल, याचा त्यांनी विचार करायला हवा होता. राहुल गांधी भाजप आणि संघावर बेधडकपणे तुटून पडतात, पण ते करताना त्याचे वैयक्तिक पातळीवर काय परिणाम होतील याचा विचार करत नाहीत. नुकतेच ते संसदेत अतिशय आक्रमक झाले होते, त्यानंतर त्यांच्यावर विशेष प्रस्ताव आणण्याची तयारी सुरू होती. त्यातून त्यांची राजकीय कारकीर्द उद्ध्वस्त होईल, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मध्यंतरी मोदी आडनावावरून त्यांनी केलेल्या एका वक्तव्यावरून त्यांच्या खासदारकीवर संकट आलेले होते. राहुल गांधी यांनी परखड विरोधी पक्षनेता म्हणून काम करायला हवे, पण हे करताना जी तलवार आपण विरोधकांवर वापरतो आहोत, त्याने आपले हात रक्तबंबाळ होणार नाहीत, याचीही काळजी घ्यायला हवी. राहुल गांधी प्रचंड मेहनत घेत आहेत, पण त्याच वेळी खासदार म्हणून सध्या लोकसभेत असलेल्या प्रियांका गांधी यांचा संयत चेहरा पुढे येत आहे. त्यांच्या भाषणात संयमी मुद्देसुदपणा आहे. राहुल गांधी यांच्यामध्ये त्याचा अभाव आहे. जेव्हा माणसाकडे संयम नसतो, तेव्हा तो माणूस काही करायला जातो, तेव्हा अनर्थ रुजतो. त्यामुळे राहुल गांधी यांनी असंयमीपणे काही विधाने केली तेव्हा त्यांनी स्वतःवर उपद्रव ओढवून घेतला.

# हापूस आंब्यावरील संकट आणि संधी



भारत–अमेरिका व्यापार करारामुळे यंदा हापूस आंब्यावरील १८ ते ५० टक्के निर्यातशुल्क शून्यावर आल्याने कोकणातील शेतकरी आणि निर्यातदारांना मोठा दिलासा मिळण्याची आ–शा आहे. त्यामुळे कोकणातील आंबा शेतकरी सुखावला असला तरी वाढत्या उन्हामुळे कोकणातील मोहर करपत असल्याने आंबा उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. निर्यात शुल्क नगण्य झाल्याने जास्तीत जास्त आंबा परदेशात पाठवला जाणार आहे. परिणामी राज्यातील आंबाप्रेमींच्या हातात उरलासुरला आंबा येणार आहे. त्यातही उत्पादन कमी झाल्याने मागणी वाढल्याने यंदाच्या मोसमात आंबा महाग होण्याची चिन्हे आहेत. यंदा जवळपास तीन लाखांहून अधिक पेट्यांची परदे–शवारी होणार असून हे प्रमाण मागील निर्यातीच्या दुपटीने आहे. यंदा दहा हजार टन आंब्याची परदेशवारी होणार आहे. एप्रिल ते जून या तीन महिन्यातच जवळपास ५ हजार पेट्या अमेरिका, युरोप आणि आखाती देशात पाठवल्या जातील. यात हापूससह, बदामी आणि केशर आंब्यालाही मागणी आहे. बाजारात आंब्याला अशी पोषक स्थिती असताना फेब्रुवारीच्या सुरुवातीला ढगाळ वातावरण, त्यानंतर महिन्याच्या मध्यावर सुरू झालेल्या उन्हाच्या झळांमुळे मोहर जळू लागला आहे. कोकणात आंब्याला मोहर येण्याच्या काळात ढगाळ वातावरण, धुके, अवकाळी पावसामुळे बागायतदार चिंतेत आहेत.

अवकाळी, लांबवलेल्या पाऊस आणि वादळीवाऱ्यामुळे नारळ, सुपारीचे नुकसान झाल्यानंतर आंब्यासमोर नवे आव्हान उभे राहिले आहे. ढगाळ वातावरणामुळे होणार्‍या कीड नियंत्रणासाठीचा फवारणीचा खर्च वाढत आहे. प्रतिझाड हा खर्च पाचशे ते सहाशे होत असल्याने आणि वारंवार तो करावा लागत असल्याने पिकाच्या दर्जावर परिणाम होणार आहे. महाडमध्ये अलीकडेच अवकाळीमुळे आंब्याचे नुकसान झाले. यंदा मोहर चांगला लागला, परंतु ढगाळ वातावरणाने मोहर गळून पडत आहे. कोकणच्या सुधागडसारख्या खाडीपट्ट्यातील आंब्याचे नुकसान तुलनेने जास्त झाले आहे. कृषी अधिकाऱ्यांकडून बागांना भेटी दिल्या जात आहेत. नुकसानाची नोंद केली जात आहे. आंबा बागायतदारांनी पंचनाम्याची मागणी केली आहे. पंचनामे होऊन तातडीने सरकारला अहवाल पाठवून शेतकऱ्यांना भरपाई मिळायला हवी. एकीकडे वातावरणामुळे होणारे नुकसान तर दुसरीकडे निर्यात शुल्कातून मिळणारा दिलास, याचे योग्य संतुलन राखण्यासाठी सरकारचा कृषी विभाग, संबंधित इतर विभाग आणि शेतकरी यांच्यातील समन्वय राखण्याची गरज आ–हे. निर्यात बदलाच्या धोरणामुळे वातावरणामुळे होणार्‍या नुकसानाची तीव्रता कमी करण्याची संधी आहे. त्यासाठी योग्य वेळी निर्णय आणि वेळच्या वेळी अंमलबजावणी व्हायला हवी. परंतु या सर्व परिस्थितीत सामान्य माणसांच्या ताटात येणारा आंबा काहीसा महागच होणार आहे. परंतु शेतकऱ्यांवरील संकटाचा विचार करता सामान्यांनी थोडा त्रास सोसायला हरकत नाही.

अस्मानी संकट टाळता येत नाही, नियोजन करून हे नुकसान कमी करता येईल, परंतु आंबा व्यवसायाला दरवर्षी फटका बसतो, त्याला इतरही घटक कारणीभूत असतात. ज्यात कोकणातील आंबा बाजारावर होणारे इतर राज्यातील आंब्याचे अतिक्रमण, आंब्याची साठेबाजी त्यातून होणारा काळाबाजार आणि दर्जेदार आंब्याच्या नावाने निकृष्ट आंबा ग्राहकांच्या माथी मारणारे, या शिवाय आंबा बाजारातील बेकायदा दलालांपासून होणाऱ्या नुकसानाची भर कमी करता येऊ शकते. यासाठी शेतकरी संघटना, आंब्याचे खरेदीदार, सरकारी यंत्रणा आणि शेतकरी यांच्यात योग्य समन्वयाची गरज आहे. करपून गळलेल्या मोहराची पाहणी कृषी अधिकार्‍यांकडून केली जात आहे. शेतकर्‍यांसाठी एवढेच पुरेसे नाही, बागांचे वेळच्या वेळी पंचनामे करून पाठवलेल्या अहवालाची तातडीने पूर्तता झाल्यास शेतकऱ्यांना वेळीच भरपाई मिळेल, यातून पुढच्या हंगामासाठी पुन्हा उभे राहण्याचे बळ शेतकऱ्यांना मिळेल. सरकारी पीक विम्याच्या निकषात बसवून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज आहे.

शेतकरी संघटनांनकडून त्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. यंदा पाऊस नोव्हेंबरपर्यंत लांबला होता. त्यामुळे मोहर धरण्यासही उशीर झाला. डिसेंबरमध्ये पडलेल्या कडाक्याच्या थंडीने धरलेला मोहर नंतरच्या ढगाळ वातावरणाने पाडून टाकला आणि उरला सुरला मोहोर आताच्या उन्हामुळे जळून गेला आहे. त्यामुळे आंब्यासमोर कधी नव्हे तेवढे मोठे संकट उभे राहिल्याने शेतकर्‍यांनी ही नैसर्गिक आपत्ती घोषित करण्याची मागणी केली आहे. प्रतिआंबा झाड ५ हजार रुपये, यानुसार हेक्टरी सुमारे ५ लाख रुपये मदत, सोबतच पीक कर्जमयार्दा ३ लाखांहून ६ लाखांपर्यंत वाढवण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. प्रतिकूल वातावरणातही दर्जा टिकवणारा आंबा मिळवण्यासाठी कृषी विभागातील सखोल संशोधनाची गरज व्यक्त होत आहे. तसेच किटकनाशके, कीड व्यवस्थापनाच्या विश्वासार्हतेबाबतही शेतकर्‍यांना खात्री मिळेल, अशा यंत्रणेची गरज आहे. आंबा बाजार आणि उत्पादन यांच्यातील दरी कमी करून हे साध्य करता येईल. निर्यात शुल्क कमी झाल्याने मिळालेल्या संधीचा पुरेसा, योग्य वापर केल्यास कोकणातील आंबा शेतकऱ्यांना या संकटाचे संधीत रुपांतर करता येणे शक्य आहे. त्यासा–ठी सरकारी पातळीवर निश्चित वेळेच्या मयार्देत कृतीशील धोरणाची आखणी आणि तातडीने अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. नाही तर संधीचे सोने नव्हे तर माती होईल.

# क्रिकेट आणि भावनांचा टी-२० सामना

भारत-पाकिस्तान यांच्यातील सामने एखाद्या झुंजीप्रमाणे सुरू असतात. या दोन्ही देशांमधील क्रिकेट सामना हा एक मोठा इव्हेंट बनतो. दोन्ही देशांमधील क्रिकेट पाहता, भारतीय क्रिकेट संघ पाकिस्तानपेक्षा प्रबळ आहे. त्यात न्यूझीलंड, आफ्रिका हे संघ देखील पाकिस्तानपेक्षा सरस कामगिरी करताना दिसतात. दोन्ही देशातल्या दुरावलेल्या संबंधांमुळे भारतीय संघ पाकिस्तानात जात नाही आणि पाकिस्तानचा संघ भारतात येत नाही. भारत -पाकिस्तान सामन्याची हवा केली जाते. यामागे आर्थिक गणिते आहेत.



२२ एप्रिल २०२५ च्या पहलगाम हल्ल्याच्या पाच महिन्यांनी एकमेकांचे कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात आशिया चषक स्पर्धेतील पहिला सामना झाला. पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमध्ये काही दिवस जोरदार युद्ध झालं. दोन्ही देशांत कमालीची कटूता आली. जी कटूता होती, ती आणखी वाढीस लागली. पाकिस्तान हा दहशतवाद पोसणारा देश असून अशा देशाबाबत भारताने आक्रमक भूमिका घेतली.त्या भूमिकेचं कारणही तसंच होतं. पहलगाम येथे पर्यटकांवर अगदी काही अंतरावरून गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. पाकिस्तानशी संबंध असलेल्या या दहशतवाद्यांनी क्रूरतेची परिसीमा गाठली होती. कोणी आपला भाऊ,कोणी वडील,तर कोणी काही दिवसांपूर्वी नातं जोडलेला आपला पती गमावला. संपूर्ण देशभर संतापाची तीव्र लाट उसळली. त्यानंतर काहीच दिवसांत आशिया चषक होणार होता.भारतीय संघ पाकिस्तानशी खेळणार की नाही? हा प्रश्न बर्‍याच जणांना पडला होता. अखेर भारतीय संघ हा सामना खेळला.परंतु, या स्पर्धेत टीम इंडियाने पाकिस्तानातील एकाही खेळाडूशी हस्तांदोलन केले नाही किंवा कोणत्याच प्रकारची चर्चा किंवा संवाद साधला नाही. सामन्यानंतरही भारताच्या संघाने पाकिस्तानी खेळाडूंशी हात मिळवण्यास नकार दिला. नाणेफेकीदरम्यान देखील भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने सारखाच पवित्रा घेतला होता आणि सामना संपल्यावरही हस्तांदोलन करण्यासाठी कोणताही भारतीय खेळाडू मैदानावर आला नाही. संपूर्ण सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानी खेळाडूंपासून पुरेसे अंतर राखले. एकंदरित भारत पाकिस्तान संबंधांचे प्रतिबिंब आशिया चषकात उमटले.

आशिया चषकात भारत आणि पाकिस्तान यांच्यात अजून दोन सामने खेळवले गेले.त्यात एका अंतिम सामन्याचा समावेश होता.आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानचा पुन्हा पराभव करून आशिया चषक स्पर्धा जिंकली. चषकावर नाव कोरले असं म्हणता येणार नाही, कारण चषकच पाकिस्तानचा गृहमंत्री, पाकिस्तान क्रिकेट बोडार्चा प्रमुख आणि आशिया क्रिकेट परिषदेचा अध्यक्ष मोहसीन नक्वी भर मैदानातून घेऊन निघून गेला. संपूर्ण स्पर्धाच वादामध्ये होती. अखेर आशिया क्रिकेट स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत प्रेक्षकांनी क्रिकेटचा आनंद लुटला, ब्रॉडकास्ट करणार्‍या चॅनेलने देखील आपली भूमिका बजावत व्यवसाय केला. तोपर्यंत पहलगाम घटनेला आणि भारत -पाकिस्तान युद्धाला पाच महिने होऊन गेले होते.

या साधारण पाच महिन्यांपूर्वी झालेल्या स्पर्धेची आठवण अशा साठीच. कारण याच भारत–पाकिस्तान कटू संबंधांत अडकलेल्या क्रिकेटच्या मैदानावर टी–२० विश्वचषकात पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तान आमने सामने आले. यावेळीदेखील दोन्ही संघांमध्ये हस्तांदोलन झालं नाही. भारतीय संघाने हा सामनादेखील एकतर्फी जिंकला. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यांबाबत पुन्हा विषय निघण्याचं कारण म्हणजे, भारताच्या पाकिस्तानशी खेळण्याबाबत अनेक मतप्रवाह देशात आहेत. सामने खेळले जावेत की नको? याबाबत अगदी आशिया चषकापासून दोन विचारसरणीच्या टीम समोरासमोर सोशल मीडियाच्या माध्यमातून उभ्या ठाकल्या आहेत.एका बाजूचं म्हणणं असं आहे की,पाकिस्तानसोबत सामने खेळायचेच कशाला? तर सामने खेळण्याचे समर्थन करणारे,आंतराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सामने खेळावे लागतात,असं सांगून फ्रंटफूटवर डिफेन्स करत आहेत.

भारत आणि पाकिस्तान हा वाद काही नवा नव्हे. १९४७ साली दोन्ही देश स्वतंत्र झाले. फाळणीत लाखो लोकांनी आपले प्राण गमावले. त्यानंतर साधारण पाच वर्षांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यात पहिला क्रिकेट सामना १९५२ साली खेळवला गेला. १९५२ मध्ये पाकिस्तानने भारत दौरा केला. तेव्हा दोन्ही संघ पहिल्यांदा खेळले. त्यानंतर दोन्ही देशांमध्ये अनेक कसोटी मालिका आणि नंतर एकदिवसीय मालिका खेळवल्या गेल्या. पुढील कालावधीत काही राजकीय कारणांमुळे दोन्ही संघांचे अनेक नियोजित दौरे रद्द करण्यात आले. १९६५ आणि १९७१ मध्ये झालेल्या दोन मोठ्या युद्धांमुळे दोन्ही देशांमध्ये क्रिकेट खेळले गेले नाही. तसेच १९९९ च्या कारगिल युद्धानंतरदेखील दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले आणि त्याचा परिणाम क्रिकेट सामन्यांवर झाला.त्यानंतर काही वर्षांनी भारत–पाकिस्तान पुन्हा एकदा एकमेकांसोबत क्रिकेट खेळू लागले. १९८० आणि १९९० च्या दशकात, दोन्ही संघांसह द्विपक्षीय आणि बहुपक्षीय एकदिवसीय मालिका आयोजित करण्यासाठी तटस्थ स्थळे निर्माण झाली.

२००८ साली मुंबई येथे दहशतवादी हल्ला झाला आणि या दोन्ही देशांमधील द्विपक्षीय मालिका बंदच झाल्या. तरीदेखील आयसीसीच्या स्पर्धांमध्ये हे दोन्ही एकमेकांसमोर येतच होते. यामुळेदेखील यामुळे दोन्ही देशांमधील क्रिकेट संबंधांमध्ये व्यत्यय आला.परंतु, २०२३च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी पुन्हा एकदा पाकिस्तानच्या संघाचे भारतात स्वागत करण्यात आले. इथल्या विमानतळांवर खेळाडूंचे स्वागत झाले. त्यानंतर २०२५ साली पहलगाम येथे निष्पाप भारतीय पर्यटकांवर पाकच्या आश्रयाला असलेल्या दहशतवाद्यांनी गोळ्या चालवल्या आणि त्याचे पडसाद क्रिकेटच्या मैदानावर उमटले आहेत, तसेच ते मैदानाच्या बाहेर देखील.

दुसरीकडे, टी–२० विश्वचषक सुरू होण्याअगोदर भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध ताणले गेले. बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला आयपीएलमधून बाहेर केल्यानंतर बांगलादेशनेदेखील भारतात खेळण्यास नकार दिला आणि अखेर बांगलादेशला विश्वचषकातून बाहेर व्हावे लागले. भारत–बांगलादेश क्रिकेट संबंध कधी सुधारतील याची कल्पना नाही, पण भारत–पाकिस्तान यांच्यातील सामने एखाद्या झुंजीप्रमाणे सुरूच आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामना हा एक मोठा इव्हेंट बनला आहे. दोन्ही देशांमधील क्रिकेट पाहता, भारतीय क्रिकेट संघ पाकिस्तानपेक्षा प्रबळ आहे. त्यात न्यूझीलंड, आफ्रिका हे संघ देखील पाकिस्तानपेक्षा सरस कामगिरी करताना दिसतात. दोन्ही देशातल्या दुरावलेल्या संबंधांमुळे भारतीय संघ पाकिस्तानात जात नाही आणि पाकिस्तानचा संघ भारतात येत नाही. फक्त आयसीसीतर्फे आयोजित स्पर्धांमध्ये दोन्ही संघ एकमेकांविरुद्ध खेळतात. मात्र हे सामने खरंच तुल्यबळ वगैरे होतात का? याचं उत्तर नाही असं दिसतं. गेल्या १० वर्षात भारत–पाकिस्तान संघ एकदिवसीय ९ वेळा आमनेसामने आलेत. यापैकी ७ सामने भारताने जिंकलेत तर एक पाकिस्तानने आणि एकात निकाल लागू शकला नाही. भारतीय संघाची जिंकण्यावर मक्तेदारी दिसते. टी२० प्रकारात गेल्या १० वर्षात भारत–पाकिस्तान संघ ११ वेळा समोरासमोर आलेत. यामध्ये भारताची कामगिरी ९–२ अशी आहे. इथेही भारताचंच वर्चस्व आहे. थोडक्यात पाकिस्तानशी आपण खेळतो आणि बहुतांशवेळा सहज जिंकतो. परंतु भारत पाकिस्तान सामन्याची हवा केली जाते. यामागे आर्थिक गणिते आहेत.

२०१९च्या आयसीसी क्रिकेट विश्वचषकात भारत–पाकिस्तान सामन्याच्या तिकीटासाठी ८ लाखांहून अधिकांनी तिकिटांसाठी अर्ज केले होते. शिवाय टीव्ही, मोबाईलवर सामना बघणारे वेगळे. १५ फेब्रुवारीला झालेल्या भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यातील सामन्याने १६३ दशलक्ष इतकी अभूतपूर्व डिजिटल पोहोच नोंदवली. जी आयसीसी टी–२० स्पर्धेत आतापर्यंतच्या कोणत्याही सामन्यासाठी सर्वाधिक आहे. याशिवाय या दोन्ही देशांतील सामन्यात हजारो कोटींची उलाढाल ही होत असते. पाकिस्तानसोबत भारताचे सामने व्हावेत, की नको याबाबत मतमतांतरे आहेत.परंतु,ज्या कारणांनी या दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले, ती कारणे किती गंभीर आहेत, याचा विचारदेखील होणे गरजेचे आहे. आतापर्यंतचा इतिहास पाहता भारत आणि पाकिस्तान यांच्यातील प्रत्येक वेळी क्रिकेट संबंधांमध्ये यॉर्कर आणि बाऊन्सर इतका जमीन आणि आसमानाचा फरक राहिलेला आहे. याला अनेकवेळा दहशतवादी हल्ले,युद्ध आणि त्यानंतर होणारे सामंजस्य करार कारणीभूत राहिलेले आहेत.

या संबंधांदरम्यान कित्येक भारतीयांनी आपले प्राण गमावले आहेत. तरीदेखील या दोन्ही देशांमधील क्रिकेट सामने सुरू आहेत. ते सुरू असावेत की नको, हा त्या त्या यंत्रणांचा निर्णय आहे.परंतु,आतापर्यंतच्या ७० वर्षांचा इतिहास पाहता अनेकदा टोकाचा संघर्ष होऊनदेखील या दोन्ही देशांतील सामन्यांची तिकीटे लाखो रूपयांना विकली गेली आहेत. आता, जर भारत आणि पाकिस्तान यांनी आपल्या उर्वरित सामन्यात विजय मिळवला तर दोन्ही संघ पुन्हा एकत्र क्रिकेट खेळताना दिसू शकतात.तो सामना झाला तर, त्या सामन्यातही हस्तांदोलन होणार नाही. एकंदरित ही स्पर्धा पण कट्टर प्रतिस्पर्धी म्हणून खेळली जाईल.या सर्व दोन देशांच्या धुमश्चक्रीत मौका, मौकासारख्या जाहिराती बनवून आर्थिक गणिते पण सोडवली जातील. टी–२० सामन्यांसारख्या फास्ट क्रिकेटनुसार, प्रेक्षकांना कदाचित आपल्या भावना फास्ट बदलाव्या लागतील. परंतु,ज्या दुर्दैवी घटनांचे प्रतिबिंब या क्रिकेट मैदानावर उमटत आहे, त्या घटनांचे गांभिर्य तर विसरता येणार नाही. यापुढे तरी या अशा घटना महत्वाच्या की खेळाडूंकडून होणारे मनोरंजन याचा विचार ज्याने त्याने करायचा आहे. किंवा निदान खेळ, आर्थिक गणितं आणि दोन देशांचा संघर्ष हे एकमेकांपासून भिन्न आहेत,हे तरी मान्य करायला हवं.

# नितळ त्वचेकरिता दालचिनीचा वापर



आपल्या एस्प्रेसो कॉफीचा स्वाद वाढवणे किंवा पुलाव, राजमा, इत्यादी पदार्थांचा स्वाद वाढविणारा मसाल्याचा सुवासिक पदार्थ म्हणजे दालचिनी. पण केवळ अन्नपदार्थांचा स्वाद वाढविणे एवढाच दालचिनीचा गुणधर्म नसून, ही दालचिनी आपल्या त्वचेच्या निगेसाठीही अत्यंत गुणकारी आहे. दालचिनीचे औषधी गुणधर्म तर गेल्या कित्येक शतकांपासून मनुष्याला ज्ञात आहेत. दालचिनीचा उपयोग आपली त्वचा नितळ आणि सुंदर बनविण्यासाठीही केला जाऊ शकतो.





### दालचिनीची पूड आणि मध

दालचिनीची पूड मधात मिसळून चेहऱ्याला लावल्यास मुरुमे पुटकुळ्या कमी होण्यास मदत होते. त्याचबरोबर त्वचा सतत कोरडी पडत असल्यास एक केळे कुस्करावे, व त्यामध्ये एक लहान चमचा दालचिनीची पूड मिसळावी. ह्या पेस्टमध्ये काही थेंब मधही घालावा. हा फेस मास्क चेहऱ्यावर दहा मिनिटे लावून ठेवावा आणि त्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवून टाकावा. या मास्कमुळे चेहऱ्याला आर्द्रता मिळून त्वचेचा कोरडेपणा दूर होतो.

### दालचिनीची पूड आणि ऑलिव्ह ऑईल

कित्येकदा प्रदूषण, मानसिक तणाव इत्यादी कारणांमुळे चेहऱ्यावर सुरकुत्या पडून अकाली वृद्धत्व आल्याप्रमाणे चेहरा दिसू लागतो. या सुरकुत्या घालविण्यासाठी दोन मोठे चमचे ऑलिव्ह ऑईलमध्ये अर्धा लहान चमचा दालचिनीची पूड मिसळावी. ही पेस्ट चेहऱ्यावर साधारण आठ ते दहा मिनिटे लावून ठेवावी. या पेस्टमधील ऑलिव्ह ऑईल त्वचेमध्ये जिरून त्वचा आर्द्र होते आणि दालचिनीमुळे त्वचेवरील मुरुमे नष्ट होतात. दहा मिनिटे उलटून गेल्यानंतर स्वच्छ ओलसर टॉवेलने चेहरा पुसून काढावा.

### दालचिनीची पूड आणि दही

त्वचेवरील मृत पेशी काढून टाकून त्वचा मुलायम, चमकदार बनवण्यासाठी दोन मोठे चमचे दालचिनीची थोडी जाडसर पूड घ्यावी. ही पूड फार भरड नेसेल याची काळजी घ्यावी. त्यामध्ये दोन मोठे चमचे मध घालावा आणि ताजे दही घालावे. या पेस्टच्या मदतीने चेहरा स्क्रब करावा. त्यामुळे त्वचेवरील सर्व मृत पेशी निघून जाऊन चेहरा नव्याने उजळेल. त्याचप्रमाणे त्वचेवरील काळे डाग घालवण्यासाठीही दालचिनीची पूड व मधाचा वापर करता येतो.

# स्ट्रेच मार्क्स घालवायचे आहेत? मग इकडे लक्ष द्या

स्ट्रेच मार्क्स हे एक प्रकारचे वण असून, त्वचा ताणली जाऊन मग एकदम सैल पडल्याने ते उद्‌भवतात. स्ट्रेच मार्क्स शरीरावर जास्त करून कंबर, पोट, मांड्या, दंड, पाठ, इत्यादी भागांमध्ये उद्‌भवतात. स्त्रियांच्या बाबतीत विशेषत: बाळंतपणानंतर स्ट्रेच मार्क्स दिसून येतात. वजन कमी झाल्याने पण त्वचा सैल पडून त्यावर स्ट्रेच मार्क्स येऊ शकतात.



आजकाल बाजारामध्ये स्ट्रेच मार्क्स घालविण्यासाठी अनेक मलमे, तेले उपलब्ध आहेत. पण या रासायनिक क्रीम्स किंवा तेलांचा वापर करण्यापेक्षा घरच्याघरी काही सोप्या उपायांचा अवलंब करून स्ट्रेच मार्क्स घालविता येऊ शकतात.

■ ह्या सर्व उपायांमध्ये वापरले जाणारे सगळे पदार्थ संपूर्णपणे प्राकृतिक असल्याने त्यांच्यापासून त्वचेला कुठल्याही प्रकारचा अपाय होण्याची शक्यता अगदी कमी असते. थोडीशी साखर, ऑलिव्ह ऑइल, आणि एका लिंबाचा रस मिसळून स्क्रब तयार करावा. हा स्क्रब स्ट्रेच मार्क्स वर लाऊन दहा मिनिटांपर्यंत चोळावा. त्यानंतर कोमट पाण्याने पुसून घेऊन स्क्रब काढून टाकावा.

■ बटाट्याच्या रसामध्ये त्वचेवरील पेशींना पोषक अशी तत्व असतात. तसेच नवीन पेशी तयार होण्यासाठीही बटाट्याचा रस उपयुक्त आहे. एका बटाट्याच्या गोल चकत्या कापून घेऊन त्या चकत्या स्ट्रेच मार्क्स आलेल्या ठिकाणी चोळाव्या. त्या चकत्यांचा रस पाच ते दहा मिनिटे स्ट्रेच मार्क्स वर तसाच राहू देऊन नंतर कोमट पाण्याने पुसून घ्यावा.

■ स्ट्रेच मार्क्स घालविण्याकरिता एरंडेल अतिशय उपयुक्त आहे. एरंडेल स्ट्रेच मार्क्स वर लावून सावकाश गोलाकार मालिश करावी. साधारण पंधरा ते वीस मिनिटे मसाज केल्यानंतर स्ट्रेच मार्क्स वर एक पातळ सुती कपडा ठेवावा आणि हिटिंग पॅड च्या मदतीने शेक घ्यावा. हा उपाय जितके वेळा करता येणे शक्य असेल तितक्या वेळेला करावा. त्यामुळे साधारण महिन्याभरात स्ट्रेच मार्क्स नाहीसे होतना दिसू लागतात.

■ तसेच ॲलो व्हेरा किंवा कोरफड ही स्ट्रेच मार्क्स घालाविण्याकरिता उत्तम समजली जाते. पण बाजारातील तयार ॲलो व्हेरा जेल वापरण्यापेक्षा कोरफडीचा ताजा गर वापरणे जास्त चांगले. कोरफडीमधील गर काढून घेऊन स्ट्रेच मार्क्स वर लावावा. हा गर स्ट्रेच मार्क्स वर दोन ते तीन तास लावून ठेवावा आणि त्यानंतर कोमट पाण्याने पुसून टाकावा.

■ जर्दाळूंची पेस्ट बनवून ती स्ट्रेच मार्क्स ला लावल्याने ही स्ट्रेच मार्क्स नाहीसे होण्यास मदत मिळते. दोन ते तीन जर्दाळूंच्या बिया काढून टाकून ते जर्दाळू बारीक वाटून घेऊन त्याची पेस्ट तयार करावी. हे पेस्ट स्ट्रेच मार्क्सवर लावून वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर कोमट पाण्याने पुसून टाकावी. या घरगुती उपायांचा अवलंब केल्याने स्ट्रेच मार्क्स निघून जाऊन त्वचा नितळ आणि चमकदार बनेल.

# पनीर माखनी

**साहित्य :** जिरं १ टिस्पून, तमालपत्र १,२ , टोमॅटो प्युरे १ मध्यम कॅन, ८,१० काजू पाण्यात भिजवून मग पेस्ट करून, लाल तिखट-चवीप्रमाणे, हळद १ टीस्पून, कसूरी मेथी १,२ टेबलस्पून, फ्रेश /हेवी क्रिम साधारण १ कप, पनीर साधारण पाव किलो किंवा १५,२० तुकडे,(जशी ग्रेवी हवी असेल त्याप्रमाणे प्रमाण कमी जास्त करावं), मीठ चवीप्रमाणे

**पाककृती :** एका पातेलीत तेल गरम करुन त्यात जिरं, तमालपत्र घालून फोडणी करावी. त्यावर टोमॅटो प्युरे घालून झाकण घालून थोडा वेळ उकळी काढावी. मग त्यात हळद, लाल तिखट घालून नीट मिक्स करून काजू पेस्ट घालून पुन्हा उकळी काढावी. नंतर त्यावर कसुरी मेथी हाताने चुरून आणि फ्रेश क्रिम घालून पुन्हा शिजू द्यावे. चवीप्रमाणे मीठ घालून सर्वात शेवटी पनीरचे तुकडे घालावेत व पुन्हा झाकण घालून शिजवावे.



**अधिक 'टीप :** लागणारे जिन्नस हे अंदाजे आहेत. आपल्या आवडीप्रमाणे प्रमाण कमी जास्त करावं. तोच अमेरिकेत इंडियन ग्रोसरीमध्ये किंवा अमेरिकन ग्रोसरीमध्ये हेवी क्रीम मिळतं ते वापरावं.

# किती लोकांनी पाहिलं तुमचं इंस्टाग्राम प्रोफाइल? असं करा चेक

तुमचं इंस्टाग्राम प्रोफाइल किती लोकांनी पाहिलं हे जाणून घेण्याचे काही मार्ग आहेत. त्यांची माहिती आपण आज घेणार आहोत. तसेच अनावश्यक लोकांपासून दूर राहण्याचा उपाय देखील सांगणार आहोत.

सध्या इंस्टाग्राम हे सर्वाधिक वापरलं जाणारं सोशल मीडिया ॲप बनलं आहे. बऱ्याचदा लोक लाइक्स आणि फॉलोवर्स मिळवण्यासाठी फोटो आणि व्हिडीओ शेअर करतात. परंतु काही वेळा लोक आपल्या प्रोफाइलवर हवे तेव्हा येतात आणि फॉलो न करता जातात. तुम्हाला जर अशा लोकांना रंगेहात पकडायचं असेल तर तुम्ही काही ट्रिक्स वापरू शकता. चला जाणून घेऊया कशाप्रकारे तुम्ही तुमच्या इंस्टाग्राम प्रोफाइलवर पाळत ठेवणाऱ्या युजर्सना शोधू शकता.



### इंस्टाग्राम प्रोफाइल कोणी पाहिलं हे कसं बघायचं

वर सांगितल्याप्रमाणे अनेक मार्गानी इंस्टाग्राम प्रोफाइल कोणी पाहिलं हे बघता येतं. लक्षात असू द्या हे मार्ग पूर्ण माहिती देत नाहीत. ह्यात स्टोरी व्युज, हायलाइट व्युज आणि थर्ड पार्टी ॲप्सचा समावेश आहे.

### इंस्टाग्राम स्टोरी कोणी पहिली हे कसं बघायचं

■ स्टोरी पोस्ट केल्यावर तुमच्या प्रोफाइल आयकॉनवर होम किंवा प्रोफाइल टॅबमधून टॅप करा.
■ प्रोफाइल पिक्चरवर टॅप करून स्टोरीज ओपन करा.
■ त्यानंतर स्वाइप अप करून कोणी स्टोरीज पाहिल्या हे चेक करा.

**नोटः** स्टोरी अपलोड केल्यावर २४ तासांमधील व्युज इथे दिसतील.

### असं पाहा इंस्टाग्राम स्टोरीज हायलाइट्स कोणी पहिल्या

■ खालच्या बाजूला उजवीकडे असलेल्या प्रोफाइल आयकॉनवर टॅप करा.
■ प्रोफाइल सेक्शनमध्ये स्टोरीज हायलाइट्सवर टॅप करा.
■ कोणत्याही हायलाइटमधील स्टोरी ओपन करा.
■ त्यानंतर स्टोरी हायलाइट स्वाइप अप करा.
■ तुम्हाला तुमच्या स्टोरीज आणि हायलाइट कोणी पहिल्या ते दिसेल.

**नोट :** इथे फक्त ४८ तासांचे व्युज दिसतात.

### प्रोफाइल व्युज बघण्यासाठी बिजनेस प्रोफाइलचा वापर

इंस्टाग्राम बिजनेस प्रोफाइल युजर्सना इंटरॅक्शन आणि रिचची माहिती देतं. त्यामुळे युजर्सना त्यांच्या प्रोफाइलला भेट देणाऱ्यांची संख्या कळते. तसेच त्यांच्या फोटोवरील व्युज आणि रिचची डेमोग्राफिक माहिती मिळते. इंस्टाग्रामवरील बिजिनेस प्रोफाइल व्हिजिटर्सवर लक्ष ठेवण्यासाठी चांगलं माध्यम आहे. लक्षात असू द्या बिजिनेस प्रोफाइल इनसाइट्सच्या मदतीनं तुम्ही फक्त व्हिजिटर्सची संख्या जाणू शकता, नावे नाही.

### इंस्टाग्रामवर बिजिनेस प्रोफाइल कसं बनवायचं

- उजवीकडे खालच्या बाजूल असलेल्या तुमच्या प्रोफाइल आयकॉनवर टॅप करा.
- वरच्या बाजूला उजव्या कोपऱ्यात असलेल्या मेन्यू आयकॉनवर टॅप करून सेटिंग आणि प्रायव्हसी मेनूमध्ये जा.
- खाली स्क्रोल करा आणि "Account Type and Tools" वर क्लिक करा.
- अकाऊंट टाइप आणि टूल मध्ये 'Switch to Professional Account' वर क्लिक करा.
- कंटिन्यूवर टॅप करून प्रोसेस पूर्ण करा.
- बिजनेस प्रोफाइलचे इनसाइट्स कसे बघायचे
- बिजिनेस अकाऊंट म्हणून व्हेरिफिकेशन केल्यावर
- तुमच्या प्रोफाइलवर जा
- बायोच्या खाली असलेल्या इनसाइट्स ऑप्शनवर टॅप करा.

### अनोळखी लोकांना इंस्टाग्राम प्रोफाइलपासून कसं दूर ठेवायचं?

अनोळखी लोकांना आपल्या प्रोफाइलपासून दूर ठेवणं सोपं आहे. तुम्ही तुमचं अकाऊंट प्रायव्हेट करू शकता. अकाऊंट प्रायव्हेट केल्यावर तुम्ही तुम्हाला कोण फॉलो करू शकतं आणि कोण प्रोफाइल पाहू शकतं हे ठरवू शकता.

### इंस्टाग्राम अकाऊन्ट प्रायव्हेट करण्याची पद्धत

■ तुमच्या प्रोफाइलमध्ये जा ■ सेटिंग्स मेनूवर टॅप करा ■ खाली स्क्रोल करून अकाऊंट प्रायव्हसीवर टॅप करा ■ प्रायव्हेट अकाऊंटसमोरील टॉगल ऑन करा.

तुमचं अकाऊंट प्रायव्हेट केल्यावर तुम्ही तुम्हाला कोण फॉलो करणार हे ठरवू शकता. तसेच ह्याच स्टेप्स फॉलो करून तुम्ही अकाऊंट पुन्हा पब्लिक करू शकता.

### साध्या पद्धतीने चेहरा स्वच्छ ठेवण्याच्या काही टिप्स

घरच्या घरी सहज साध्या पद्धतीने चेहरा स्वच्छ ठेवण्याच्या काही टिप्स आहेत, त्यामुळे दिवसाच्या थकव्यानंतर त्वचेला स्वच्छ करणे तसेच पुनरुज्जीवित करणे आवश्यक असते. त्यासाठी घरच्या घरी सहज साध्या पद्धतीने चेहरा स्वच्छ ठेवण्याच्या काही टिप्स

ही काळजी घ्या आणि सतेज कांती मिळवा

■ चेहरा धुण्यासाठी तुमच्या त्वचेनुसार योग्य ते फेस वॉश अथवा क्लिंजिग वापरा.

■ चेहऱ्यावरील छिद्र बुजवण्यासाठी क्लिंजिंग मिल्कच्या सहाय्याने चेहरा साफ करा.

■ चेहऱ्याच्या त्वचेला सोसवेल इतकी गरम वाफ घ्या.

■ चेहरा थंड करण्यासाठी बर्फाने मसाज करा.

■ त्यानंतर फेस स्क्रबरने ८-१० मिनिटे चेहरा साफ करा.

■ चेहरा सुकल्यानंतर चेहऱ्याला मध लावा जेणेकरून त्वचा उजळ होण्यास मदत होईल

■ चेहरा स्वच्छ धुवून आवडीनुसार फेस पॅक लावा.

■ हळूहळू चेहरा सुकू द्या.



# चेहऱ्यावरील केस हटवण्याकरिता अवलंबा हे उपाय

चेहऱ्यावरील नकोसे असणारे केस कसे हटवावे हा तरुण मुली किंवा महिलांच्या समोरील मोठा प्रश्नच असतो. हे केस हटवण्याकरिता अनेक उपाय उपलब्ध आहेत. त्यापैकी वॅक्सिंग, थ्रेडिंग, लेसरद्वारे केस काढून टाकणे असे अनेक उपाय साधारणपणे अवलंबले जातात. पण या उपायांच्या व्यतिरिक्त घरच्या घरी काही उपाय करून चेहऱ्यावरील केस हटवता येऊ शकतात. या उपायांच्या अवलंबाने चेहऱ्यावरील केसांची वाढ हलकी होऊन कालांतराने संपूर्णपणे बंद होते.

चेहऱ्यावरील केस काढून टाकण्याकरिता एक उत्तम फेस पॅक घरच्या घरी तयार करता येतो. एका भांड्यामध्ये अर्धा कप बेसन, एक लहान चमचा हळद, एक लहान चमचा दुधावरची साय आणि अर्धा कप दूध हे सर्व एकत्र करून त्याची दाट पेस्ट बनवावी. ही पेस्ट चेहऱ्यावर व्यवस्थित लावून घ्यावी. सुमारे अर्धा तास ही पेस्ट चेहऱ्यावर तशीच राहू द्यावी. त्यानंतर ज्या दिशेने केसांची वाढ असेल, त्याच्या विरुद्ध दिशेने चेहरा हळुवार गोलाकार चोळण्यास सुरुवात करावी. हा फेस पॅक चेहऱ्यावरून पूर्णपणे काढून टाकल्यानंतर कोमट पाण्याने चेहरा स्वच्छ धुवून टाकावा. आठवड्यातून दोन वेळेला या फेस पॅकचा वापर करावा.



एका बाऊलमध्ये एक मोठा चमचा पपईचा गर, अर्धा लहान चमचा हळद आणि चार मोठे चमचे ॲलो व्हेरा जेल वापरून पेस्ट तयार करावी. आपल्या चेहऱ्यावर नकोशा केसांची वाढ जिथे आहे, त्या भागावर ही पेस्ट लावून, सुमारे वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर केसांच्या वाढीच्या विरुद्ध दिशेने चोळत पेस्ट चेहऱ्यावरून उतरवून टाकावी व नंतर कोमट पाण्याने चेहरा धुवून टाकावा.



एका मोठ्या लिंबाच्या रसामध्ये एक मोठा चमचा मध मिसळावा. हे मिश्रण वीस ते पंचवीस मिनिटे चेहऱ्याला लावून ठेवावे. या फेस मास्कमुळे चेहऱ्यावरील केसांची वाढ हलकी होत जाते आणि कालांतराने संपूर्णपणे थांबून जाते.

# कापूर : छोट्या-मोठ्या आजारात प्रभावी औषध

**कापूर** हा विशिष्ट झाडांपासून बनवला जाणारा सुगंधी पदार्थ घरात, मंदिरात पूजा करताना आवर्जून वापरला जातो. देवाची कापूर आरती करण्याची प्रथा भारतात सर्वत्र आहे. हा कापूर आयुर्वेदात एक घरगुती औषधी म्हणून महत्त्वाचा मानला गेला असून त्याचे अनेक उपयोग आहेत. इतकेच नव्हे तर त्वचा, केस, स्नायू यांचे अनेक विकार त्याने दूर करता येतात. कापूर आणि त्याचे तेल यांचा वापर अनेक औषधे बनवताना केला जातो. त्यापासून अनेक मलमे बनवली जातात. पोटदुखी असेल तर एक ग्लास पाण्यात १ चमचा ओवा घालून ते पाणी उकळवून अर्धे झाले की त्यात थोडा कापूर घालून प्यायल्याने दुखण्याला उतार पडतो. सांधेदुखीत कापूर तेलाचे मालिश केल्यास बरे वाटते. तसेच खाज, इन्फेक्शन यावर खोबरेल तेलात कापूर घालून चोळण्याने आराम पडतो. भाजले असेल तर त्या ठिकाणी कापूर तेल लावल्यास जळजळ थांबते आणि संसर्ग होत नाही. इतकेच नव्हे तर घरात कापूर जाळला तरी घरातील जंतू नष्ट होतात. तोंडावर मुरमे, पुटकुळ्या येत असतील तर खोबरेल तेल आणि कापूर यांचे मिश्रण त्वचेवर चोळल्यास डाग राहत नाहीत. कोमट पाण्यात कापूर आणि थोडे मीठ घालून पाय बुडवून बसले तर टाचेच्या भेगा कमी होतात. ओलिव्ह तेलात कापूर घालून त्याने डोक्याला मसाज केल्यास स्ट्रेस, डोकेदुखी थांबते. दातदुखी असेल तर कापूर पावडर दातात धरली तर दात दुखायचा थांबतो. सर्दी खोकला झाल्यास खोबरेल तेल आणि कापूर यांचे मिश्रण छाती, डोक्यावर चोळावे. आराम पडतो. जुलाब होत असतील तर ओवा, कापूर आणि पेपरमिंट समप्रमाणात घेऊन काचेच्या बरणीत उन्हात ठेवावे. ६-८ तासांनंतर मिश्रणाचे ४-५ थेंब टाकून सरबत घ्यावे. रात्री झोपण्यापूर्वी कच्चे दुध आणि कापूर पावडर कापसाने चेहऱ्यावर लावावी आणि १५ मिनिटाने धुवावे. त्वचा चमकदार आणि हेल्दी होते. कापले किंवा कोणत्याची कारणाने जखम झाली तर कापूरमिश्रित पाणी लावावे. तोंड आल्यास शुद्ध तुपात कापूर घालून सेवन केल्यास उतार पडतो. पर्यटन अथवा ट्रेकिंगसाठी अधिक उंचीच्या ठिकाणी गेल्यास अनेकदा श्वास घ्यायला त्रास होतो, चक्कर येते अशावेळी कापूर नुसता हुंगला तरी आराम पडतो.



# डोके दुखतेय? हे करून पहा

आपल्या शरीराचा महत्त्वाचा भाग म्हणजे डोके. डोक्याच्या कवटीत आपला मेंदू असतो व हा मेंदूच साऱ्या शरीराचे नियंत्रण करत असतो. डोकेदुखीचा त्रास झाला नाही असा माणूस शोधूनही सापडणे अवघड. डोके दुखायला लागले की काही सुचेनासे होते. अशा वेळी चटकन एखादी वेदनाशामक गोळी घेण्याकडे आपला सहजच कल असतो. पण डोके नक्की कोणत्या कारणाने दुखते हे कळले तर त्यावर अगदी सहज सोपे उपाय करूनही ही डोकेदुखी थांबवता येते. त्यासाठी ही माहिती जरूर वाचा.


■ डोके दुखत असेल तर अमसुले पाण्यात भिजत घालून, कुस्करून साखर मीठ घातलेले सरबत अथवा कोकम सरबत घ्यावे.

■ बरेच वेळा रात्री काही कारणाने झोपायला उशीर होतो व जागरण होते. जागरणाने डोके दुखत असेल तर १५ मिनिटे झोप अथवा विश्रांती हा चांगला उपाय आहे. डोक्यातील कलकलही या विश्रांतीमुळे कमी होते.

■ वेळी-अवेळी खाणे. सततचे उपवास अथवा बराच काळ उपाशी राहणे याने पित्त वाढते व बरेच वेळा त्यामुळे डोकेदुखी होते. पित्ताने डोके दुखत असल्यास गार दूध प्यावे.

■ अर्धशिशीचा त्रास होत असेल तर - सुंठ अधिक जायफळ यांचा लेप भुवईच्या वर लावावा. शिंक काढण्याच्या कोणत्याही उपायाने शिंक काढल्यासही अर्धशिशी कमी होते अथवा सकाळी उठल्याबरोबर पेढा खाल्ल्याने ती कमी होते. अर्धशिशी पित्त व सर्दीमुळे होते. पेढ्याने पित्त कमी होते व शिंक काढण्याने सर्दी मोकळी होते. अर्धशिशी म्हणजे डोक्याचा अर्धा भाग दुखणे. हे दुखणे त्रासदायक असते व सूर्योदयापासून ते सुरू होते ते सूर्यास्तानंतर कमी होते.

■ सर्दी अथवा बारीक ताप किंवा अंग मोडून येणे यासारख्या आजारातही डोके दुखते. गरम पाण्याच्या पिशवीने डोके शेकून काढल्यास ही डोकेदुखी थांबते. अथवा अमृतांजन किंवा तत्सम बाम डोक्यास चोळल्यासही आराम पडतो.



■ बरेच वेळा जादा वाचन, टीव्ही पाहणे अथवा डोळ्यावर ताण आणणारी कामे झाल्यासही डोके दुखते. अशा वेळी डोळ्यांना चष्मा आला नाही ना, याची खात्री करून घ्यावी. डोळ्याला नंबर आल्यानेही डोकेदुखी होते व योग्य नंबरचा चष्मा वापरायला सुरुवात केली की ती बंद होते.

# वजन घटवण्यास सहाय्यक 'सुपर फूड्स'

वजन घटवण्याच्या एकंदर कवायतीत 'सुपर फूड्स' वापरणे उपयुक्त ठरू लागलेले आहे. सुपर फूड्स अशा अन्नपदार्थांना म्हटले गेले आहे, ज्यांच्या सेवनाने वजन घटवण्यास मदत तर मिळतेच, शिवाय आपल्या शरीराला आवश्यक असे सर्व प्रकारचे पोषणही मिळते.

**बदाम :** बदाम हा अन्नपदार्थ आपल्या शरीरास अनेक प्रकारे उपयुक्त आहे. बदामाच्या सेवनाने बुद्धिमत्ता तीक्ष्ण होते हे ज्ञान फार पूर्वीपासूनचे आहे. तसेच बदामाच्या सेवनाने वजन घटवण्यासही मदत मिळते. बदामामध्ये असलेले एल अर्जेनाईन हे अमिनो ॲसिड व्यायामाच्या वेळी शरीरातील फॅट्स वेगाने वापरले जाण्यास मदत करते. याचमुळे बदामाला नैसर्गिक 'वेट लॉस पिल' असेही म्हटले गेले आहे. या सुपर फूडचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी बदाम आपल्या दैनंदिन आहारात जरूर समाविष्ट करावा. रोज रात्री बदाम पाण्यामध्ये भिजत घालून दुसऱ्या दिवशी सकाळी खावेत. साधारण पाच ते सात बदामांचे सेवन आपल्या दररोजच्या आहारामध्ये असावे.



**ओटमील :** वजन एकदा कमी झाले की ते तसेच टिकवून ठेवणे हेही मोठेच काम असते. त्या कामी ओटमील आपली मदत करू शकते. ओटमीलमध्ये बीटा ग्लुकोन नावाचे फायबर असते, ज्यामुळे ओटमील खाल्ल्यानंतर पुष्कळ वेळपर्यंत पोट भरलेले राहून लवकर भूक लागत नाही. तसेच ओटमीलमध्ये कॅलरीजची मात्रा अतिशय कमी असून अन्य 'रेडी टू ईट' नाश्त्यांच्या पदार्थांच्या मानाने फायबरही मुबलक प्रमाणात असते. साधारण दीड कप ओटमीलमध्ये १५० कॅलरीज असतात.

**संत्रे :** वजन घटवण्यास सहाय्यक अशा सुपर फूड्समध्ये अगदी सहज उपलब्ध असते ते म्हणजे संत्रे. अँटी ऑक्सिडंट्स भरपूर मात्रेमध्ये असणारे हे फळ शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करण्यास उपयुक्त आहे. संत्र्याच्या नियमित सेवनाने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते व त्वचाही नितळ, सुंदर दिसू लागते. एका पूर्ण संत्र्यामध्ये केवळ ५९ कॅलरीज असतात. संत्र्यामध्ये फायबरही मुबलक असून त्याच्या सेवनाने भूक लवकर शमते.



**कडधान्ये :** मसूर, राजमा यांसारखी कडधान्ये फायबर आणि प्रथिनांनी परिपूर्ण असतात. यामध्ये स्टार्च ही असतो. कडधान्यांच्या सेवनाने वजन घटवत असताना देखील शरीरातील ताकद चांगली टिकून राहते व अशक्तपणा जाणवत नाही. कडधान्यांप्रमाणेच जवस ही वजन घटवण्यासाठी अतिशय उपयुक्त आहेत. यामध्येही फायबरचे प्रमाण खूप जास्त आहे. तसेच जवसामध्ये ओमेगा ३ फॅटी ॲसिड्सही आहेत. आजवर केल्या गेलेल्या अनेक शास्त्रीय अभ्यासांमध्ये हे निदान केले गेले आहे की ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स वजन घटवण्यास सहाय्यक असून हृदयाच्या आरोग्याकरिताही अतिशय गुणकारी आहेत. जवस भाजून त्याची पूड करून घेऊन ही पूड आपले ज्यूस, स्मूदी, दही व ताकामध्ये मिसळून सेवन करावी.

# मुंबईकरांच्या जीवाशी खेळ! उंदीर मारण्याचं औषध शिंपडून फळांची विक्री

## मालाडमधील संतापजनक प्रकार उघड

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

आपण आरोग्य चांगले राहावे म्हणून बाजारातून ताजी फळे विकत घेतो, पण तीच फळे जर तुमच्या मृत्यूला कारणीभूत ठरणार असतील तर? मुंबईच्या मालाड परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. ग्राहकांना विकल्या जाणाऱ्या फळांवर चक्क उंदीर मारण्याचे विषारी औषध शिंपडल्याचा प्रकार उघडकीस आला असून, यामुळे संपूर्ण मुंबईत खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना बेड्या ठोकल्या आहेत.

**नेमकी घटना काय आहे?**
मालाड परिसरात फळ विक्रेते ग्राहकांच्या आरोग्याशी खेळत असल्याची तक्रार स्थानिक नागरिक कुणाल साळुंखे यांनी पोलिसांकडे केली होती. दोन फळ विक्रेते फळांवर उंदीर मारण्याचे जहाल विषारी औषध लावत होते. हा सर्व प्रकार कॅमेऱ्यात कैद झाला असून, त्याचा व्हिडिओ समोर आल्यानंतर नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. तक्रार मिळताच मालाड पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवली आणि संबंधित फळविक्रेत्यांच्या दुकानावर धाड टाकली. प्राथमिक चौकशीनंतर पोलिसांनी हे दुकान सील केले असून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले आहे.



### फळ विक्रेत्यांवर पोलीसांची कारवाई

मालाड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दुष्यंत चव्हाण यांनी या घटनेच्या गांभीर्याबद्दल माहिती दिली. ते म्हणाले की, "नागरिकांच्या तक्रारीनंतर आम्ही तातडीने कारवाई केली आहे. या दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १२५, २७४, २७५ आणि २८६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण करणे हा गंभीर गुन्हा असून पुढील तपास सुरू आहे."

### नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन

या घटनेमुळे 'बाहेरून फळे आणताना ती किती सुरक्षित आहेत?' असा प्रश्न उपस्थित झाला आहे. प्रशासनाकडून आणि पोलिसांकडून नागरिकांना काही महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बाजारातून आणलेली फळे किमान १५-२० मिनिटे कोमट पाण्यात धुवावीत. फळांचा रंग किंवा वास संशयास्पद वाटल्यास ती खाऊ नयेत. रस्त्यावरील कोणत्याही विक्रेत्याकडून फळे घेताना स्वच्छतेची खात्री करावी. असा कोणताही संशयास्पद प्रकार आढळल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. हेल्दी राहण्याच्या नादात आपण आपल्या कुटुंबाला विष तर वाढत नाही ना? याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. मालाडमधील या घटनेने अन्न सुरक्षा विभागाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

# ई-गव्हर्नन्स मूल्यमापनात वसई-विरार पालिकेचा 'नववा क्रमांक' कायम

■ **पालघर। प्रतिनिधी,**

राज्यातील महानगरपालिकांच्या ई-गव्हर्नन्स कामकाजाच्या मूल्यमापनात वसईझ्विरार महानगरपालिकाने यंदाही नववा क्रमांक पटकावत सलग दुसऱ्या वर्षी आपले स्थान कायम राखले आहे. सामान्य नागरिकांना ऑनलाइन सेवा सुलभपणे उपलब्ध करून देणे, प्रशासनात पारदर्शकता वाढवणे आणि डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करणे या निकषांवर पालिकेचे मूल्यमापन करण्यात आले. पुणे येथील पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन (पीआरओ) या संस्थेने राज्यातील २९ महानगरपालिकांचा ई-गव्हर्नन्स निदेर्शांक तपासला. सेवा उपलब्धता, प्रशासनातील पारदर्शकता, संकेतस्थळाची उपलब्धता, मोबाईल ॲप, तसेच समाजमाध्यमांचा वापर अशा विविध बाबींचा या सर्वेक्षणात समावेश होता. या सर्व निकषांवर वसईझ्विरार महानगरपालिकेने ६.४४ गुण मिळवत नववे स्थान मिळवले आहे. पालिकेने ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करत स्वतःचे स्वतंत्र संकेतस्थळ, मोबाईल ॲप आणि समाजमाध्यमांवरील अधिकृत खाती कार्यान्वित केली आहेत. यामुळे नागरिकांना काही मिनिटांत माहिती मिळणे, तक्रारी नोंदवणे, करभरणा करणे तसेच विविध नागरी सेवांचा लाभ घेणे सुलभ झाले आहे. कोरोना काळानंतर ऑनलाइन सेवा वितरणाचे महत्त्व वाढले असून, शासनाने ई-गव्हर्नन्सला आधुनिक प्रशासकीय व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक मानले आहे.

# डोंबिवलीत १० बिअर आणि ४५ झोपेच्या गोळ्या खाऊन आत्महत्येचा प्रयत्न

**नेमकं काय घडलं?**
ही घटना डोंबिवली पश्चिमभागतील विष्णूनगर पोलीस ठाणे हद्दीतील एका रुग्णालयात घडली. संबंधित डॉक्टर आणि त्याची पत्नी देखील डॉक्टरच आहे. दोघेही मिळून रुग्णालय चालवण्याचे काम करत होते. डॉक्टर रुग्णालयात न आल्याने त्यांना अनेकदा फोन करण्यात आले होते, परंतु डॉक्टरांनी फोनच उचलला नाही. तेव्हा कर्मचारी डॉक्टरांच्या घरी गेले असता, डॉक्टर बेशुद्ध अवस्थेत पडले होते.

■ **डोंबिवली ।प्रतिनिधी,**

डोंबिवलीच्या पश्चिमनगरमध्ये एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. १० बिअर पिऊन आणि ४५ झोपेच्या गोळ्या खाऊन नामांकित रुग्णालयाच्या वरिष्ठ डॉक्टरांनी आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. संबंधित डॉक्टरचे एका नर्ससोबत प्रेमसंबंध होते, याच कारणाने डॉक्टरने आत्महत्या करत जीवन संपवण्याचा निर्णय घेतला होता. या घटनेनं रुग्णालयासह परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

### डॉक्टरांचे नर्ससोबत प्रेमसंबंध



त्यानंतर त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु करण्यात आले, सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती समोर आली. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉक्टरांचे नर्ससोबत प्रेमसंबंध आहे. संबंधित डॉक्टरांचा आणि त्यांच्या पत्नीचा नेहमी वाद व्हायचा. याच वादाला कंटाळून डॉक्टर एका उच्चभ्रू सोसायटीत घर घेऊन राहत होते.

### १० बिअर आणि ४५ झोपेच्या गोळ्या खाऊन डॉक्टरांचा आत्महत्येचा प्रयत्न

त्यानंतर नर्सने डॉक्टरकडे लग्नासाठी तगादा लावला. त्यानंतर डॉक्टरांनी सांगितले की, माझं लग्न झाले आहे. तुज्याशी लग्न कसं करता येईल. त्यानंतर नर्सने डॉक्टरांशी बोलणे बंद केले. याच कारणावरून डॉक्टर व्यथित होऊन त्यांनी १० बिअर पिऊन ४५ झोपेच्या गोळ्या खाऊन आत्महत्येचा निर्णय घेतला, या प्रकरणाचा विष्णूनगर पोलिसांनी तपास करण्यास सुरुवात केली आहे.

# नगर-दौंड महामार्गावर भरधाव आलेल्या ट्रकने कारला चिरडलं... तिघांचा जागीच अंत

■ **बीड ।प्रतिनिधी,**

श्रींगोंदा येथील नगर - दौंड महामार्गावरील कोळगाव शिवाराज पहाटे तीन वाजेच्याा सुमारास एक भीषण अपघात झाला. एका भरधाव आलेल्या ट्रकने एका कारला जागीच चिरडलं, या अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे. या अपघातातील मृत्यू झालेल्या तिघांची नावे समोर आली आहे.

### अपघातात तिघांचा दुर्दैवी अंत

या अपघातात नितीन कोकाटे (वय २२, रा. काष्टी, चालक), गजानन जनार्धन पायघन (वय ४७), दुर्पा गजानन पायघन (वय ३६) आणि वैभव गजानन पायघन (वय १९) अशी मृतांची नावे आहेत. याच अपघातात एक १३ वषार्चा मुलगा गंभीर जखमी झाला असून



त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

### दौंडहून नगरकडे जाणाऱ्या ट्रकने कारला चिरडले

पायघन कुटुंबातील सदस्या कामानिमित्त श्रींगोंदा तालुक्यातील चिंभळे गावात चालले होते. काष्टी येथील चालक नितीन कोकाटे याला घेऊन ते आपले मूळ गाव अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यातील मळतूर येथे गेले होते. २३ फेब्रुवारी रोजी रात्री ते पुन्हा चिंभळे येथे येण्यासाठी निघाले असता, पहाटे तीन वाजताच्या सुमारास कोळगाव शिवारातील माऊली मंदिर परिसरात त्यांची गाडी आली असता, दौंडहून नगरकडे जाणाऱ्या ट्रकने त्यांच्या गाडीला जोराची धडक दिली.

ही धडक इतकी भीषण होती, इको गाडीचा चक्काचूर होऊन चौघांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणात पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत नागरिकांच्या मदतीने गाडीत अडकून पडलेले मृतदेह बाहेर काढण्यात आले. दरम्यान, सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी श्रीगोंजा येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# २ सख्ख्या बहिणींना जबरदस्तीने कारमधून नेण्याचा प्रयत्न

■ **बीड ।प्रतिनिधी,**

बीडच्या माजलगाव शहरातील संजीवनी हॉस्पिटलसमोरून दोन सख्ख्या बहिणींचे बळजबरीने अपहरण करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी दुपारी घडली. पीडित मुलींच्या ओरडण्यामुळे आंबेडकर चौकातील सतर्क नागरिकांनी धावत्या गाडीला अडवून दोन्ही मुलींची सुटका केली. याप्रकरणी माजलगाव शहर पोलिसांनी तत्परता दाखवत तीन तरुणांविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी भाग्यश्री ज्ञानोबा हजारे (वय २४, रा. अंबाजोगाई) ही डी. फार्मसीची विद्यार्थिनी आपल्या बहिणीसह उपचारासाठी माजलगाव येथे आली होती. दुपारी १२:३० च्या सुमारास त्या हॉस्पिटलबाहेर उभ्या असताना, एका पांढऱ्या रंगाच्या



चारचाकीतून आलेल्या तिघांनी दोघींनाही बळजबरीने गाडीत ओढले आणि दरवाजे लॉक केले. आरोपींनी गाडी धारूर रोडच्या दिशेने वेगाने पळवण्यास सुरुवात केली.

गाडी मुख्य रस्त्यावर असताना पीडित मुलीने मोठ्याने आरडाओरडा केला. हा आवाज ऐकताच आंबेडकर चौकातील नागरिकांनी प्रसंगावधान राखून गाडी समोरून अडवली. दरम्यान, मुलींचा मावसभाऊ सुरज भद्रे यानेही स्कूटीवरून गाडीचा पाठलाग करून चौक गाठला होता. संतप्त जमावाने गाडीतील तिन्ही तरुणांना पकडून चोप दिला आणि त्यांना पोलिसांच्या स्वाधीन केले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी दिनेश पुरुषोत्तम देवकते (रा. येल्डा, ता. अंबाजोगाई),रविंद्र विभीषण निळे (रा. चौथेवाडी, ता. अंबाजोगाई), मजरह सिकंदर सय्यद (रा. चौथेवाडी, ता. अंबाजोगाई) या तीन आरोपींवर माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ५७/२०२६ अन्वये इठर कलम १३७ (२), ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भरवस्तीत आणि दिवसाढवळ्या घडलेल्या या प्रकारामुळे माजलगाव शहरात दहशतीचे वातावरण पसरले आहे. मात्र, नागरिकांनी दाखवलेल्या शौयार्मुळे एका मोठ्या अनथार्ला वेळीच रोखण्यात यश आले, असे बोलले जात आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# विरुद्ध दिशेने जाणाऱ्या वाहन चालकासोबत रुपाली पाटील ठोंबरेंचा मोठा वाद
## शाब्दिक चकमक... व्हिडीओ व्हायरल



■ **ठाणे। प्रतिनिधी,**

पुण्यातील राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नेत्या रूपाली ठोंबरे-पाटील यांचा विरुद्ध दिशेने वाहतूक करणाऱ्या इसमासोबत वाद झाला आहे. या वादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. पुण्यातील फडके हॉल परिसरात विरुद्ध दिशेने येणाऱ्या एका हायब्रिड गाडीमुळे हा वाद ट्राफिक जाम झाल्यानंतर हा वाद उद्धवला. या संबंधी विश्रामबाग पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेमकं काय घडलं जाणून घेऊया.

### रुपाली पाटील आक्रमक

पुण्यातील फडके हॉल परिसरात विरुद्ध दिशेने येणाऱ्या हायब्रिड गाडीमुळे ट्राफिक जाम झाल्याचे कृष्णा खोब्रागडे यांनी आकाश पाटील यांना सांगितलं. मात्र या दोघांमध्ये वाद सुरु झाला. यानंतर राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली ठोंबरे-पाटील त्याठिकाणी दाखल झाल्या. त्यांनी दोघांमधील वाद मिटवला. मात्र हा वाद मिटवताना त्या आक्रमक झाल्याचं पहायला मिळालं.

### गुन्हा दाखल

या घटनेसंदर्भात पुण्यातील विश्रामबाग पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ३० वर्षीय मुलाने आपल्याच घरात आईचे दागिने चोरले!
## अवघ्या ३ तासांत पोलिसांनी ताब्यात घेतलं अन्...

■ **लातूर। प्रतिनिधी,**

लातूर जिल्ह्यात एका ३० वर्षीय तरुणाने त्याच्याच घरातून आपल्या आईने दागिने चोरल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. पोलीस अधिकाऱ्यांनीच या प्रकरणाबाबत एका न्यूज एजन्सीला माहिती दिली. आरोपीने त्याच्याच घरात घुसून आपल्या आईचे दागिने चोरले. संबंधित प्रकरणाची पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आणि तक्रार मिळाल्यानंतर काही तासांतच पोलिसांनी आरोपी तरुणाला अटक केल्याचं वृत्त आहे.

### आरोपीने गुन्हा केला कबूल

प्रकरणाची तक्रार मिळताच, पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून तातडीने तपास सुरू केला. लोकल इंटेलिजन्स इनपुट,



संशयितांची पडताळणी आणि टेक्निकल विश्लेषणानंतर तक्रारदार महिलेचा ३० वर्षीय मुलगा प्रशांत भामरे याच्यावर पोलिसांना संशय आला आणि घटनेनंतर केवळ तीन तासांतच आरोपीला ताब्यात घेण्यात आलं. अखेर, कठोर चौकशीनंतर आरोपी मुलाने चोरीचा गुन्हा कबूल केला.

### पोलिसांनी दिली माहिती

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी तरुणाने आपल्या आईचे दागिने चोरले आणि ते आपल्याच घरातील एका तिजोरीत लपवून ठेवले. चौकशीनंतर, पोलिसांनी मुलाने चोरलेले दागिने ताब्यात घेतले आणि तक्रारदार महिलेकडे सोपवले. ज्या पद्धतीने चोरीची घटना घडली, त्यावरून तपासादरम्यान महिलेच्या मुलाकडे संशयाची सुई वळली आणि त्यानंतर त्याला अटक करण्यात आली.

**मुलानेच आईचे दागिने चोरले अन्...**
सुनीता दगडू भामरे (५०) अशी तक्रारदार महिलेची ओळख समोर आली असून ती लातूरच्या भडगाव येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. संबंधित महिलेने पोलिसांना माहिती देताना सांगितलं की, सोमवारी एक अज्ञात पुरुष त्यांच्या घरात शिरला आणि त्याने घरातील सोन्याचे दागिने चोरले. चोरलेल्या दागिन्यांमध्ये एक हार, सहा अंगठ्या आणि दोन झुमक्यांचा समावेश आहे.

# अंगावर सीमा अन् खुशी नावाचे दोन टॅटू
## विहिरीत अज्ञात व्यक्तीचा सडलेला मृतदेह आढळला, पाहू देखील वाटेना!

■ **जालना। प्रतिनिधी,**

जालना जिल्ह्यातील रोहनवाडी शिवारात आज एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह विहिरीत आढळून आल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. हा मृतदेह पूर्णपणे सडलेल्या अवस्थेत असून, त्याची अवस्था इतकी भीषण आहे की तो पाहणेही अशक्य झाले आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, ही हत्या आहे की आत्महत्या, याबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

### नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, जालन्याजवळील रोहनवाडी येथील एका शेतातील विहिरीत आज दुपारच्या सुमारास काही ग्रामस्थांना दुर्गंधी जाणवली. विहिरीत डोकावून पाहिले असता, एका पुरुषाचा मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसून आला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली. ग्रामस्थांनी तातडीने या घटनेची माहिती स्थानिक पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह विहिरीबाहेर काढला.

### मृतदेहाची भीषण अवस्था

हा मृतदेह गेल्या अनेक दिवसांपासून पाण्यात



असल्याने तो पूर्णपणे फुगलेला आणि सडलेल्या अवस्थेत आहे. मृतदेहाचा चेहरा ओळखण्यापलीकडे गेला असून, पाहणाऱ्याच्या अंगावर काटा येईल अशी स्थिती निर्माण झाली आहे. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असल्याचे प्राथमिक अंदाजानुसार सांगण्यात येत आहे.

### ओळखीसाठी 'टॅटू'चा मोठा आधार

पोलिसांसमोर सध्या या व्यक्तीची ओळख पटविण्याचे मोठे आव्हान आहे. मात्र, मृतदेहाच्या हातावर गोंदलेली नावे तपासासाठी महत्त्वाची ठरू शकतात. मयताच्या हाताच्या पंजाच्या पाठीमागील बाजूस ह्यखुशीह्ण आणि ह्यवंशह्ण अशी नावे गोंदलेली आहेत, तर हातावर 'सीमाह्ण आणि ह्यसाईनाथह्ण अशी नावे आहेत. या नावांवरून पोलिसांनी आता तपास सुरू केला असून, जिल्ह्यातील बेपत्ता व्यक्तींच्या तक्रारींची पडताळणी केली जात आहे.

**हत्या की आत्महत्या? चर्चांना उधाण**
हा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. संबंधित व्यक्तीने विहिरीत उडी मारून आत्महत्या केली की त्याची हत्या करून मृतदेह विहिरीत फेकून देण्यात आला, या संशयाने परिसरात चर्चांना उधाण आले आहे. शवविच्छेदनानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले आहे. रोहनवाडी येथील या घटनेने संपूर्ण जालना तालुक्यात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जर कोणाला या वर्णनाची व्यक्ती किंवा हातावर अशी नावे गोंदलेला कोणी नातेवाईक अथवा परिचित बेपत्ता असल्याची माहिती असल्यास, त्यांनी तातडीने जालना पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा. मृतदेहाची ओळख पटविण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले असून, संबंधित व्यक्तीबाबत माहिती असल्यास जवळच्या पोलीस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ना पाणी, ना अन्न, किर्रर अंधार... ४ वर्षांचा चिमूकला शिक्षकांच्या निष्काळजीपणामुळे रात्रभर शाळेत

■ **नागपूर। प्रतिनिधी,**

नागपूर जिल्ह्यात धक्कादायक प्रकार घडला आहे. खेळता खेळता थकलेला ४ वर्षीय चिमुकला रात्रभर शाळेत कोंडला गेला. महिला कर्मचाऱ्यांनी शाळेची खोली न तपासात बंद केली, चिमुकला वर्गाच्या मागच्या बाजूने झोपला असल्याने ही बाब लक्षात आली नाही. संध्याकाळी ०५:३० वाजून गेल्यावरही चिमुकला परत न आल्याने पालकांनी खापरखेडा पोलीस स्टेशन मध्ये तक्रार नोंदविली. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरु केला.




### नेमकं काय घडलं?

बुधवारी नागपूरमध्ये शाळेतील महिला कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे धक्कादायक प्रकार घडला. खेळता खेळता थकलेला चार वर्षीय चिमुकला रात्रभर शाळेत कोंडला गेला. रात्रभर ना जेवन, ना पाणी, चारंही बाजूनं काळोख अशा स्थितीत चार वर्षांचा हिमांशु रात्रभर शाळेत होता. तो न घाबरता शाळेत बसून राहिला. शाळेतील कर्मचाऱ्यांच्या निष्काळजी पणामुळे हे घडल्याचे कुटुंबियांनी सांगितले.

**कुटुंबियांनी दिली प्रतिक्रिया**
ह्लदुपारी हिमांशु खेळत होता, सायंकाळी सहापर्यंत तो खेळत होता. नंतर दिसतंच नव्हता. आम्ही घाबरून गेलो. मग पोलीस तक्रार केली. पोलीसांनी आणि आम्ही रात्रभर शोधलं. आम्ही घाबरुन गेलो होतो, रात्रभर बाहेर शोधत फिरलो. शेवटी दुसऱ्या दिवशी ११ वाजता तो शाळेत सापडला. तो सांगतो रात्रभर शाळेत पाणी आणि जेवण नव्हतं. पण रात्रभर रडला नाहीह्व असे हिमांशूच्या आई-वडीलांनी सांगितले.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी ७ वेगवेगळे पथक नेमून रात्रभर मुलाचा शोध घेतला मात्र आढळून आला नाही. अखेरचा पर्याय म्हणून जेव्हा सकाळी शाळेची तपासणी केली तेव्हा मुलगा सुखरूप शाळेत आढळुन आला. शाळेतील कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे घडली मोठी घटना, मात्र मुलगा सुखरूप आढल्याने नातवाईकांसह पोलिसांचा जीव भांड्यात पडला. बुधवारी रात्री हा मुलगा शाळेत कोंडला गेला, दुसऱ्या दिवशी म्हणजेच काल सकाळी आढळून आला.

# पोटच्या २ लेकरांना २० हजाराला विकले, ५ दिवसांच्या मुलीची विक्री करताना आई सापडली

■ **सांगली। प्रतिनिधी,**

सांगली जिल्ह्यातील मिरज येथे आईने स्वतः पोटच्या दोन लेकरांची विक्री केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. प्रत्येकी २० हजार रुपये प्रमाणे दोन लहान मुलांची विक्री दीड वर्षापूर्वी करण्यात आली होती. तिसऱ्या पाच दिवसांच्या मुलीची विक्री करत असताना महिला बाल कल्याण समाज, सांगली जिल्हा यांच्या पथकाने करवाई करत मिरज शहर पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

**२० हजारांना विक्री**
याप्रकरणी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी रोहिणी महादेव वाघमारे यांनी तक्रार दिली आहे. याबाबत मनीषा जाधव (रा. सुभाषनगर), उमाजी रमेश लोंढे, सुरेखा लोंढे, दशरथ लोंढे, सचिन गोसावी (रा. माधवनगर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपी मनिषा जाधव हिने दीड वर्षापूर्वी आपल्या पहिल्या बालकाला 20 हजार रुपयाला कोल्हापूर चाळ, मिरज याठिकाणी विकले होते. त्यानंतर माधवनगर येथे आणखी एका बालकाला विकले.



मनिषा जाधव हिला मागील आठवड्यात मुलगी झाल्यानंतर तिची सुध्दा विकण्याचा प्रयत्न करत असताना सदरचा प्रकार उघडकीस आला. सदरची तीनही बालके महिला बाल कल्याण समितीने ताब्यात घेतले आहेत. त्यांना सध्या मिरजेतील पाठक अनाथ आश्रम याठिकाणी ठेवण्यात आले आहे. सदरची करवाई जिल्हा महिला बाल विकास अधिकारी वर्षा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण अधिकारी रोहिणी वाघमारे, आयेशा दानवडे, शानुर दानवाडे,आरती निडसोसे, यांच्या पथकाने केली. अधिक तपास पीएसआय विनायक मसाळे करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com